
महागाई कां?



लेखक

श्री. दा. भोलनीस

एम. ए. एल्एल. बी.

ब्लॉक–कला प्रोसेस, कोल्हापूर.

महागाई कां ?

लेखक :

श्री. रा. पोतनीस, एम्. ए. एल्एल् बी.

किंमत १॥ रुपाया

प्रकाशक :
गोविंद वामन कुलकर्णी,
महाराष्ट्र ग्रंथ–भांडार,
कोल्हापूर.

प्रथमावृत्ति तारीख २० जुलै १९४३.

मुद्रक :
बाळकृष्ण नारायण ठकार,
श्रीसिद्धेश्वर प्रिंटिंग प्रेस,
कोल्हापूर.



कै. ती. अण्णांना

अनुक्रमणिका

महागाई कां?

बाजारांतील दृश्यें.

आज बाजारचा अन् सुट्टीचा दिवस, म्हणून बाजारांत सहज फेर-फटका मारून यावें म्हणून गेलो. तिथें कितीतरी विविध दृश्यें दृष्टीस पडलीं. आमच्या गल्लींतील चिंतोपंत भाजीवाल्या बाईशीं हुज्जत घालीत होते. दुसरे शेजारी तिंबूनाना दूधवाल्या गवळ्याशीं तक्रार करीत होते. गुंड्याभाऊ वाणसौद्याच्या दुकानदाराजवळ कटकट करीत होते. साध्या मोडीच्या अभावीं मला बाजार करणें अशक्य झालें. बाजारांत प्रत्येकजण तोंडाला येईल तो भाव सांगत होता. अन् त्यांत काय मिळेल तो पै पैसा स्वस्त मिळालें म्हणून गिऱ्हाईक धन्यता मानीत होतें.

तसें पाहिलें तर प्रत्येकाच्या खिशांत पैसा भरपूर होता, पण पदरांत बांधलेला पैसा बाहेरचें सूर्यदर्शन करण्यास नाराज दिसला. चिंतोपंत भाजी-वाल्या बाईस म्हणाले " काय ग, ही भाजी का एवढी महाग? ही कांहीं लढाईवर जात नाहीं! पण आपलं, लढाई सुरू झाली कीं प्रत्येकानें दुस-ऱ्यास लुबाडण्यासाठीं किंमती उगाच वाढवावयाच्या!"

त्या बाईनें शांतपणें उत्तर दिलें " अहो दादा, आम्ही काय करावें? ही भाजी लढाईवर जात नाहीं खरें, पण तुम्ही जो पैसा माझ्या मालास देता, त्या पैशाचे डाळ, तांदूळ, जोंधळे कोठें येतात पूर्वीप्रमाणें? पूर्वीच्या

तिसरा हिस्साहि मिळत नाहींत. मग आम्ही आमचें पोट कसें भरावें ? मला सांगता त्या ऐवजी डाळ तांदूळ विकणाऱ्यांना सांगा जा कीं ते जिन्नस पूर्वीच्या भावानें विका म्हणून ! अशा महागाईत आम्ही कसें जगावें ?"

तिंबूनानानाहि गवळी तेच सुनवित होता. गुंड्याभाऊंची समजूत किराणामालाचा दुकानदार थोड्याश्या निराळ्या शब्दांत घालीत होता. "काय करावें महाराज, आमच्या पदरांतच पूर्वीच्या धारणीनें माल पडत नाहीं तर ? चढ भाव देऊनहि पदरांत भरपूर माल पडत नाहीं, अन् त्यांत तो अमुकच भावानें अमुक एवढाच माल विकला पाहिजे हा सरकारी दंडक आहे तो निराळाच ! रेल्वे तक्रार करते आमचेकडे वॅगन्स नाहींत म्हणून ! आता माल कसा यायचा, अन् आम्ही कसें जगायचें तुम्हीच सांगा !"

जगावें कसें ?

"जगावें कसें ?" हाच प्रश्न आज प्रत्येकापुढें आ वासून उभा आहे. ही महागाई गोरगरिबापासून श्रीमंतांपर्यंत सर्वांना पदोपदीं नडवीत आहे. महायुद्धाच्या पहिल्या दोन वर्षांत विमानांतून होणाऱ्या संभाव्य बॉंब-हल्ल्यांनीं लोक बेचैन झाले होते. गेल्या वर्षी युद्ध हिंदुस्थानच्या प्रत्यक्ष दारांतच येऊन ठेपलें. ब्रह्मदेशचा लढा संपल्यावर जपानची स्वारी आमच्या देशावर अटळ आहे या कल्पनेनें प्रत्येकाचें मन ग्रस्त झालेलें होतें. तो संभव थोडासा दृष्टिक्षेपाच्या टप्प्याबाहेर जातों न जातों तोंच, महागाईच्या भस्मासुरानें हिंदुस्थानास पछाडलें. आणि दिवसेंदिवस ही महर्गता चढत्या श्रेणीने वाढून, लोकांना संकटग्रस्त करूं लागली आहे. 'युद्ध लांब आहे तर ही परिस्थिती, हिंदुस्थानांतच दुर्दैवानें रणांगण उघडलें गेले तर काय शोचनीय अवस्था होईल ?" याची कल्पनेनेंहि जाणीव होऊं शकत नाहीं. आमचा देश मुख्यतः शेतकीप्रधान, धान्यादि पदार्थ इथें रगड

पिकतात, तिथें अन्नाची पंचाईत लोकांना पडावी इतकें दैवदुर्विलासाचें उदाहरण दुसरें सांपडणार नाहीं. हिंदुस्थानच्या हजारों वर्षांच्या इतिहासांत जीवनमरणाचा लढा इतका भीषण व कटुतर केव्हांच झाला नव्हता.

बाजारांतून घरीं परत आलों तर हजारों विचारांचे काहूर डोक्यांत उसळलें. ' ही अत्यंतिक महागाई का उद्भवावी ? त्यामुळें इतक्या हाल-अपेष्टा लहानापासून थोरापर्यंत, सधनापासून निर्धनापर्यंत, सर्वांना का सहन कराव्या लागाव्यात ? याचें कारण जर प्रामुख्यानें प्रचलित महायुद्ध असेल, तर गेल्या महायुद्धांतहि लोकांना असाच कठीण प्रसंग अनुभवावा लागला आहे काय ? " अशा हजारों प्रश्नांनीं माझ्याप्रमाणेंच प्रत्येकास भंडावून सोडलें असल्यास नवल नाहीं. याच प्रश्नांचा उलघडा शक्य झाल्यास सोप्या व सुलभ भाषेमध्यें सर्वांना समजेल अशा रीतीनें करावा, या हेतूनें हें छोटेखानी पुस्तक मी लिहिण्यास प्रवृत्त झालों आहे. कारण चालू महर्गतेची कारणमीमांसा सर्व सामान्य माणसास संपूर्ण कल्पनेच्या व माहितीच्या अभावीं करतां येणें अशक्य आहे. यामुळें व्यवहारांत पुष्कळ वेळां त्याची कारणमीमांसा एकांगी, अपुरी व असमाधानकारक वाटते. पण त्यास त्या बिचाऱ्याचा काय दोष ?

बाजारभावांची तुलना

मनुष्यास तुलनात्मक दृष्टीनें पाहण्याचा व त्यांतून सुख हुडकून काढण्याचा हव्यास फार मोठा आहे. या दृष्टीनें गेल्या महायुद्धांत महागाई किती तीव्र होती आणि चालू युद्धांतहि ती कशी कशी तीव्रतर होत गेली हें अभ्यासण्याजोगें आहे या हेतूनेंच रोजच्या व्यवहारांत लागणाऱ्या अन्नादि पदार्थांचे प्रत्यक्ष बाजारभाव कसे होते व आहेत याचें कोष्टक देऊं म्हणजे आजच्या अत्यंतिक महागाईची कल्पना पुरेपूर येईल.

	१९१८	१९१९	१९२०	१९२१	१९३९	१९४०	१९४१	१९४३ एप्रिल
१ जोंधळें	५	३	३॥	४	१०	०	९	२
२ गहूं	४॥।	३	२॥	०	६	६	५॥	१॥
३ तुरी	५॥	३॥	३	४	५॥।	५॥	५	२
४ हरभरे	६।	०	२॥।	३॥	५॥।	५॥	५	२
५ मसुरा	४	२।	०	२॥	०	४॥	०	२
६ वाटाणे	०	०	०	३	८	७	०	२
७ मूग	६।	२	०	३	७	६	५॥	२
८ मिरची	६	११	१३	०	४॥	५॥	७	२३ रु.
९ भात	४॥	६	९	०	४॥	५	५॥	२२ रु.
१० गोड तेल भुईमूगाचे	५	१२	१०॥	८	६	६॥	०	१३॥ रु.

सदरहू कोष्टकांतील अनुक्रम नं. १ ते ८ पर्यंत आंकडे दर रुपयास मिळणाऱ्या कोल्हापुरी जुन्या शेरमापांचे असून, पुढील तीन कोष्टकांतील आंकडे हे जुन्या कोल्हापुरी दरमणास असलेल्या रुपयांचे आहेत. सदरहू कोष्टकांतील माहिती कै. ती. वडील यांनीं आपल्या प्रपंच वहींतून काढून दिली आहे. सर्व बाजारभाव कोल्हापुरांतले आहेत. हें पुस्तक छापलें जात असतां, चालू मे महिन्यांत वरील भाव अधिकच कडाडले गेले आहेत. गेल्या युद्धांत साधारणपणें जानेवारी १९१९ पासून सात आठ महिने भाव कडाडले होते, ते पुनः १९२० च्या मोसमांत सुधारले. मोसम संपताच पुनः १९२१ च्या फेब्रुआरीपर्यंत पुनः ५।६ महिने हे भाव कडाडले गेले होते.

रुपयाची किंमत चार आणे

हें आजच्या महागाईचें खरें खुरें चित्र आहे. सरकारच्या अर्थ शास्त्र विशारदानें जें महर्गतेचें कोष्टक तयार केलें आहे, त्यावरून १९४० पासून १९४२ जूनपर्यंत महागाई दीडपट वाढली असें दर्शविलें आहे. कलकत्ता व मुंबई येथील महर्गतेचे जे आंकडे (Index No.) प्रसिद्ध झाले आहेत त्यावरूनहि युद्धापूर्वीचे बाजारभाव आज फारतर दुपटीनें वाढलेले आहेत, असें दिसून येते. पण मोठ्या कष्टानें असें म्हणणें भाग पडते कीं ते सारे आंकडे वस्तुस्थितीनिदर्शक नाहींत. सरकारनें जाहीर केलेल्या भावास आज बाजारांत कोणताच जिन्नस मिळूं शकत नाहीं, हा प्रत्येकाचा नित्य अनुभव आहे. आजची बाजारांतील धारण वर कोष्टकांत नमूद केली आहे, त्यावरून आपणास इतकें खात्रीपूर्वक म्हणता येईल कीं धान्यादि पदार्थांचे बाबतींत सरसकट आज निदान चौपटीनें तरी महागाई खास झालेली

आहे. कपड्यालत्त्यांच्या बाबतींतहि हेंच अनुभवास येत आहे. सरकारी कोष्टकांत उपलब्ध झालेल्या आंकड्याप्रमाणें, साखरेसारखे अपवादात्मक पदार्थ सोडल्यास, बाजारांत कोणताहि जिन्नस, पूर्वीच्या तिप्पट किंमतीस सुद्धा मिळत नाहीं. म्हणूनच मी असें म्हणतो कीं आज रुपयाची किंमत मालाच्या मोबदल्यांत तीनचार आणेच झालेली आहे, म्हणून सध्याचा घोंटाळा निर्माण झालेला आहे. शाबुदाणा, दालचिनीसारख्या परदेशाहून येणाऱ्या जिन्नसांच्या किंमती दसपट, क्वचित प्रसंगीं वीसपट सुद्धां वाढलेल्या आहेत. पण या जिनसा आमच्या देशांत निर्माण होत नसल्याने, प्रतिकूल परिस्थितींत त्यांच्या किंमती भरमसाट वाढणें स्वाभाविक आहे, ही साधी व सरळ गोष्ट प्रत्येकास चटकन समजते. गेल्या महायुद्धांतहि जर्मन रंगाच्या डब्यांच्या किंमती कितीतरी पटीनें वाढलेल्या सर्वांच्या स्मरणांत असतील.

पण धनधान्यादि पदार्थ वैपुल्यानें पिकणाऱ्या आमच्या देशांत आज लोक अन्नास महाग व्हावेत हें मोठें कोडें सर्वांना वाटते. गेल्या वर्षापासून विशेषतः ही महागाई क्रमाक्रमानें वाढत चालली व ती आज कळसास पोचली आहे. चालू मोसमांत तरी बाजारभाव सुधारतील हीहि आशा आता फोल ठरली असून, उलट ते बाजारभाव जास्तीच वाईट झाले आहेत. आजच जर ही महर्गतेची आंच, तर वर्षानुवर्ष चालविले जाणार म्हणून जाहीर झालेल्या चालू महायुद्धाची पुढील वर्षे कशीं येणार ? याची साधी कल्पनासुद्धा सर्वसामान्य माणसाच्या अंगांवर भीतीनें रोमांच उभे करण्यास पुरेसी आहे. महायुद्धांतील नांदीच जर का इतकी भेसूर, तर भरत-वाक्याच्या वेळची अवस्था – ? छे, तो विचारसुद्धां मनास संपूर्ण ग्रासून, भेडसावून सोडण्यास पुरेसा आहे.

कागदी नोटांचा गारुडी खेळ.

तसें पाहिलें तर युद्धामुळें उद्योगधंद्यांना आज बरकत आली, अनेक नवीन उद्योगांना चालना मिळाली, बेकारांना सुवर्णसंधि मिळाली, नोकर-वर्गाचे पगार वाढले, मजुरांना महागाई भत्ता मिळूं लागला, आणि शेत-कींत पिकणाऱ्या मालास चांगली तेजी आली. शेतकऱ्यापासून सर्वांच्या खिश्यांत भरपूर पैसा खुळखुळूं लागला आहे, पण लंकेंतील सोन्याच्या विटा-प्रमाणें तो पैसा प्रपंचांत कांहीं केल्या वांटणीस येईनासा झाला आहे. सुमारें दहा वर्षांपूर्वी ज्या शेतकऱ्याचें धान्य पैशापरी पासरी अशा फुकट मोलानें विकलें गेलें, त्याच शेतकऱ्याजवळ आज कागदी नोटांची भेंडोळी दिस-तात. अशा पैश्याच्या वैपुल्याच्या कालांत शेतकऱ्यांचे चेहरे संकटग्रस्त का बरें दिसावेत ?

हीच तर पैशाची खरी जादू आहे. पैशाच्या मागें सर्वजण धांवत आहेत, कारण समाजांतील प्रत्येकजण आपली श्रीमंती पैशांत मोजतो आहे. जवळ पैसा मुबलक असणें हेंच नाहीं का आपण श्रीमंतीचें लक्षण समजत ? एरव्ही श्रीमंतांना गरिबापेक्षां काय निराळीं शिंगे असतात! फार-तर कोठें कोठें कान थोडें लांब असतील !

पैसा व त्याचें कार्य

पैशाविषयीची खरी कल्पना फारच थोड्यांना असते. पैशाचा खरा उपयोग सर्वसामान्यपणें आपणास हव्या असणाऱ्या जिनसा पैदा करणें व त्यापासून सुख मिळविणें हा आहे. पैशाच्या राशी रचून शेखमहंमदी करण्यांत गर्क असणारा कद्रु मनुष्य आपण घटकाभर बाजूस ठेवूं. 'पैसा' नामक चलनाची कल्पना निघण्यापूर्वी, समाजांत ऐनजिनसी विनिमयच

होत असे. पण त्यामुळें समाजांत पुष्कळ गैरसोई होऊं लागल्या व वेळेवर आपणास जरूर असलेला जिन्नस मिळेना, म्हणून ' पैसा ' नामक कल्पना निघाली. समाजांतील देवघेव सोपी व सुलभ व्हावी याचसाठीं पैशाचें माध्यम साधन म्हणून निघालें. सर्व जिन्नसांची किंमत एका माध्यमांत होण्यानें, समाजांतील देवघेवीमधील पुष्कळ अडचणी दूर झाल्या. म्हणूनच पैशास एवढी उपयुक्तता व महत्व प्राप्त झालें आहे. एरव्हीं पैशांत कांहीं श्रीमंती दडलेली नाहीं, किंवा बाका प्रसंग ओढवला तर पैसा चावून खाऊन कांहीं पोट भरत नाहीं, हें कांहीं सांगावयास नको.

तसेंच कोणत्याहि वस्तूची किंमत, मग ती पैशांत असो वा इतर वस्तूमध्यें असो, त्या वस्तूचा पुरवठा व त्यास असलेली मागणी या तत्त्वानुसार ठरत असते. पुरवठा कायम राहून मागणी वाढली किंवा पुरवठा कमी होऊन मागणी कायम राहिली कीं त्याचें पर्यवसान, त्या वस्तूची किंमत वाढण्यांत होते, ही गोष्ट नित्यानुभवाची आहे.

या दोन गोष्टी लक्ष्यांत ठेवून आजच्या परिस्थितीचा विचार केला, की पुष्कळ बिकट वाटणाऱ्या गोष्टींचा उलघडा चटकन होतो. पैसा ही एक उपयुक्त वस्तू मानल्यावर, समाजांत पैशाचा पुरवठा विपुल होणें व त्यामानानें मागणी मात्र न वाढणें, म्हणजेच पैसा स्वस्त होणें नाहीं का ? पण आपण पैसा अगर नाणें स्वस्त झालें असें न म्हणता, वस्तू महाग झाल्या असें म्हणण्याचा प्रघात आहे. पैसा हे देवघेवीचे सामर्थ्य असलेली साधनभूत वस्तू. तें देऊन त्याच्या मोबदला इतर वस्तू किती प्रमाणांत मिळतात, यावर पैशाचें खरें मोल अवलंबून आहे. पण हें कळलें तरी पटत नाही. कारण समाजांत इतर वस्तूप्रमाणें पैसा विकण्याचें दुकान आढळत नाहीं. तरी पण दुकानांत माल नेला असता, आपणास दुकानदार पैसे नाहीं का देत ? या दृष्टीनें आजच्या पैशाच्या वैपुल्यांत पैशाचें मोल कमी

झाल्यानें, वस्तू महाग झालेल्या आढळतात. म्हणूनच, आज सर्व सामान्य मनुष्य आपली श्रीमंती पैशांत न मोजता, इतर जीवनोपयोगी वस्तूंच्या साठ्यांत मोजूं लागला आहे.

रुपयाची किंमत

आजचा रुपाया व पांच वर्षांपूर्वीचा रुपाया तोच होता (सध्यां शुद्ध चांदीचे नाणें सरकारनें बंद केले ही गोष्ट अलाहिदा, पण रुपाया हें कायदेशीर नाणें तेंच आहे.) कारण नाणें म्हटलें तरी काय, कागदावर अगर अन्य धातूच्या पत्र्यावर बादशहाचा मुखवटा उठविलेली व कायद्यानें किंमत ठरविलेली वस्तू. पण एक रुपयास पांचवर्षांपूर्वी जेवढें तांदूळ, डाळ मिळत होते, त्याचा चौथा हिस्साहि आजचा रुपाया खरेदी करूं शकत नाहीं. रुपाया बदलला नाहीं, पण त्याची विकत घेणेची शक्ति मात्र निःसंशय कमी झाली. यासच अर्थशास्त्रज्ञ रुपयाची क्रयशक्ति (Purchasing Power) कमी झाली, असें जाडजूड भाषेंत म्हणतात.

नाण्याची क्रयशक्ति स्थिर व कायम राखणें हें सामाजिक स्थैर्याच्या दृष्टीनें इष्ट व पथ्यकर असल्यानें, तें एक प्रत्येक आधुनिक सरकारचें कर्तव्य मानलें जातें. आधुनिक सरकारच्या आर्थिक धोरणांतील ग्यानबाची मेख ही, कीं बाजार भावामध्यें एकदम तेजी मंदी निर्माण होऊं न देणें. पैशाची किंमत स्थिर न राखल्यामुळें, सामाजिक जीवनांत प्रचंड आंदोलनें निर्माण होतात. पांच वर्षांपूर्वी लोकांच्या दृष्टीला पैसा फारसा पडत नव्हता, पण त्या वेळचा एक रुपाया व्यक्तीला लागणाऱ्या कितीतरी गरजा भागवूं शकत होता. पण आज रुपायांच्या नोटांची पुडकी जवळ असूनहि तो गरजांना पुरेसा होईना. गेल्या पांच वर्षांतील परस्पर विरोधी हे दोन अनुभव लोकांच्या वांटणीस आले. हलाखीच्या संकटांतून जरा कोठें सावरतो न साव-

रतों तोंच, महर्गतेच्या भोंवऱ्यांत हिंदी मनुष्य गटांगळ्या खाऊं लागला आहे. बाजारभावाच्या मंदीमुळें येणारी हलाखी परवडली; निदान पोटभर भाकरी तरी मिळत होती, पण सध्याची महागाई व त्यामुळें होणारी उपासमार नको, असें म्हणण्याची पाळी त्यावर आलेली आहे.

रुपायाच्या खरेदी करण्याच्या शक्तींत चढउतार झाल्यानें मनुष्याच्या जीवनास कसें हेलकावे बसतात, हें आपण स्वानुभवानेंच पहातो आहोंत. हिंदुस्थानांत आज जे रुपयाचें मोल कमी झालें व ज्यामुळें आज हिंदी माणसावर एवढा प्रसंग ओढवला, त्यास कोणकोणती कारणें हें आतां पाहूं. तत्पूर्वी एक गोष्ट स्पष्ट केली पाहिजे कीं नाण्यांचें वैपुल्य एवढें एकच एक कारण सध्याच्या महागाईस कारणीभूत नाहीं. त्याचबरोबर देशांतील मालास परदेशची मागणी वाढली, लष्करी कारणाकडे त्याचा प्रचंड ओघ वाहूं लागला व युद्धजन्य परिस्थितीमुळें वहातुकीचीं साधनें लोकांना पूर्वीप्रमाणें उपलब्ध होईनात, अशा एक ना हजार गोष्टी सध्याच्या परिस्थितीस कारणीभूत आहेत, त्यांचाहि यथाक्रम आपण विचार करूं.

कागदी नोटांचा निधी

नाण्यांचें कार्य आपण पाहिलें. धातूमय नाणें ही सोईची कल्पना खरी, पण त्याहिपेक्षां सोईची युक्ति म्हणजे कागदी नोटा होत. धातूमय नाण्यापेक्षां कागदी नोटा किती सुटसुटीत व सोईच्या हें काय निराळें सांगावयास पाहिजे ? आधुनिक सुधारलेल्या समाजांत धातूमय अवजड नाणीं वापरणें म्हणजे शुद्ध रानटीपणा. कारण चलनाची किंमत त्यामध्यें असलेल्या धातूच्या किंमतीवरून ठरविणें, ही झाली जुनी बुरसलेली कल्पना.

पण कागदी नोटांच्या बाबतींत महत्वाचा व नाजुक प्रश्न म्हणजे त्याच्या मोबदला मागणी बरहुकूम द्याव्या लागणाऱ्या रोकडीचा होय.

केवळ छापखाना सत्तेचा आहे व संग्रहीं कागद विपुल आहे, म्हणून वाटेल तशा बेपर्वाईनें नोटा छापून चलन वाढविता येत नाहीं. कागदी नोटांचा हा गारुडी खेळ फार काळजीपूर्वक रिझर्वबँकेस खेळावा लागतो. अफगाणिस्थानांतील बचा–ई–साकूनें कातडी नाणीं काढलीं, पण योग्य त्या तारणाच्या अभावीं त्याचा बोजवारा उडाला, हें आपण पाहिलेंच. अशा कागदी नोटांच्या स्थैर्यासाठीं एक निधी ठेवण्याची जबाबदारी नोटा काढणाऱ्या सरकारवर अगर रिझर्व बँकेवर असते. येथील कागदी चलनाबाबतच्या निधीमध्यें सोने, सोन्याची नाणीं, पौंडांतले रोखे, रोकड रुपये, रुपयांतले रोखे, हुंड्या असें वेगवेगळे गट केले असून, त्या सर्वांची बेरीज व्यवहारांत खेळत्या असलेल्या एकूण नोटांइतकी असली पाहिजे, अशी जबाबदारी कायद्यानें रिझर्व बँकेच्या शिरावर टाकली आहे. यापैकीं एकंदर निधीच्या दोनतृतीयांशापेक्षां कमी नाहीं इतक्या रकमेचें सोने, सोन्याचीं नाणीं व पौंडांतले रोखे असलेच पाहिजे. आणि त्यांतहि सुवर्णाचा भाग चाळीस कोटी किमान असला पाहिजे असा दंडक घालून दिलेला आहे. बाकीचा निधी रोकड रुपये, रुपायांतले रोखे, कायद्यानें मान्य केलेल्या हुंड्या व वचनचिठ्या या स्वरूपांत असावा लागतो. रुपयाच्या रोख्यांत गुंतवावयाची रक्कम एकंदर जिंदगीच्या $\frac{1}{4}$ पेक्षा अगर पन्नास कोटीपेक्षा–यापैकी जी रक्कम अधिक होईल त्यापेक्षां–जास्त असतां कामा नये असें ठरविण्यांत आलें आहे.

सोन्याचांदीवरील लोकांचा विश्वास

हिंदुस्थानांतील कागदी चलन पद्धतीचें अधिष्ठान इतर देशापेक्षां मुद्दाम भरभक्कम पायावर ठेवण्यांत आलें आहे. याचें कारण हा देश परतंत्र, अज्ञानी व मागासलेला असल्यानें, हिंदी लोकांचा कागदी चलनावरचा विश्वास केव्हां चटकन नाहींसा होईल याचा नेम नसतो. अशा वेळीं सरकारची अब्रू जाऊं नये, म्हणून इतकी कडेकोट तरतूद कायद्यानें केलेली

आहे. कारण एकदा लोकांचा विश्वास डळमळला कीं ते कागदी नोटा स्वीकारण्याचें नाकारतात व रोकड रुपयांचा हट्ट धरतात, असा येथील अनुभव आहे. याचें कारण एकच कीं सर्वसामान्य जनतेचा सोने, चांदी धातूवर असलेला विलक्षण विश्वास. याच हिशोबानें हिंदी मनुष्य या धातूंचा हौसेनें मोठ्या प्रमाणावर सांठा करूं इच्छितो. गेल्या महायुद्धांत सरकारवरील विश्वास डळमळताच, लोकांनीं पोस्ट ऑफिसावर आपापल्या ठेवी परत घेण्यासाठीं व त्याहि रोकड रुपयांतच मिळण्याबद्दल किती गिलका केला होता, हें पुष्कळांच्या स्मरणांत असेल पण इंग्रज बहाद्दरनेंहि नुकसान सोसून, रोकड रुपये पोती भरून आणून लोकांचें समाधान केलें व विश्वास संपादला. गेल्या वर्षी जपानच्या संभाव्य स्वारीच्या भयामुळें, लोकांनीं सोने-चांदी खरेदी करण्याचा सपाटा सुरूं करताच, विशेषतः चांदीचा भाव एकदम कडाडला, हें याचें ताजें उदाहरण आहे. इतक्या विवेचनानंतर, देशांतील आजच्या चलनविस्ताराचा विचार करूं.

चलन विस्तार का आवश्यक ?

साधारणपणें लढाईसारख्या धामधुमीच्या कालांत देशाचा लष्करी खर्च अवाढव्य वाढतो; असा नियम आहे. कारण युद्ध ही राष्ट्रानें आपण-हून ओढवून घेतलेली खर्चाची आपत्ति आहे. आणि अशा वेळीं परराष्ट्राचीं देणी भागविण्यासाठीं व देशांतील गरज भागविण्यासाठीं, चलन वाढविणें सरकारास भाग पडते. पण याच जोडीस युद्धकालांत देशांतील उत्पादन झपाट्यानें वाढते, नवीन उद्योगधंद्याना चालना मिळते आणि देशांतील देव-घेवीमध्येंहि पुष्कळच वाढ होते. आणि वाढत्या देवघेवींचा व वाढत्या चल-नाचा मेळ बसला म्हणजे देशांत फारसा घोंटाळा माजत नाहीं. युद्धासारख्या आणिबाणीच्या प्रसंगीं चलनाची वाढ ही गोष्ट अपरिहार्य असली तरी

त्याचा वाढत्या उत्पादनाशीं असलेला मेळ केव्हांहि सुटता कामा नये, अशी दक्षता घ्यावी लागते. या दृष्टीनें हिंदुस्थानसरकारच्या चलन विस्ताराचा विचार करणें योग्य ठरणार आहे. गेल्या तीन वर्षांत कागदी चलनाची वाढ कशी झाली व कागदी चलनाप्रीत्यर्थ ठेवलेल्या निधीमध्यें कसेकसे फेरफार झाले, ते पहा:—

कागदी चलनाच्या निधींतील घटक दाखविणारे कोष्टक

(खालील आंकडे कोटी रुपयांचे आहेत.)

तारीख, माहे सन	देशांतील खेळत्या कागदी नोटा.	सुवर्ण	कागदी पौंडाचे रोख्यांत झालेली वाढ.	रुपयांचे रोख्यांत झालेली वाढ.	रोकड रुपये.
सप्टेंबर १९३९	१९६	४४	६१	३७	७६
सप्टेंबर १९४०	२३२	४४	१३१	५०	३६
सप्टेंबर १९४१	२८४	४४	१३५	७७	३९
सप्टेंबर १९४२	४८८	४४	३२५	१०२	२७
जानेवारी १९४३	५८८	४४	३६४	१७८	१४
२६ फेब्रुवारी १९४३	६१४	४४	३८५	१८९	१४
२ एप्रिल १९४३	६५१	४४	४४७	१५४	१४
७ मे १९४३	६८९	४४	५१५	१२५	१५
२१ मे १९४३	७००	४४	५२९	१२५	१२

कागदी चलनाची वाढ

वरील कोष्टकावरून दोन तीन गोष्टी स्पष्टपणें दिसून येतात. युद्धारंभापासून गेल्या एप्रिल महिन्यापर्यंत कागदी चलन सुमारें शेंकडा ३४५ टक्केनीं वाढलें. गेल्या वर्षापासून विशेषतः या कागदी चलनाची अवाढव्य झालेली वाढ चटकन डोळयांत भरते. आज साधारणपणें शेंकडा ८५ टक्के चलन व्यवहारांत कागदीच आढळते. याच गतीनें थोड्या दिवसांत ते ९५ चा टप्पा सहज गांठेल. सरकारनें नवीन प्रसृत केलेला हलका रुपाया नाणें सुद्धां व्यवहारांत फारच क्वचित दृष्टीस पडते. साधारणपणें रोज सरासरीनें एक कोट रुपयांच्या कागदी नोटांची भर नव्यानें व्यवहारांत पडत आहे.

याच्या उलट देशांतील उत्पादनाची वाढ पाहिली, तर वरील कालांत फार झालें तर शेंकडा ३० नीं वाढलेचें दिसेल. अर्थात वरील वाढलेल्या कागदी चलनाचा मेळ वाढलेल्या उत्पादनाशीं मुळींच बसूं शकत नाहीं, हें आतां कांहीं निराळें सांगावयास नको. अर्थात लोकांच्या हातीं नेहमींच्या देवघेवींना पुरून उरेल असा बराच पैसा आला, तो लोकांनीं बँकामध्यें शिल्लक टाकला असेल काय, अशी शंका उद्भवणें स्वाभाविक आहे. खासगी बँकेंतील लोकांच्या ठेवींचे आंकडे असे आहेत. युद्धारंभीं बँकांमधील ठेवी १३१ कोट रुपयांच्या होत्या, त्या चालू वर्षारंभीं ३४५ कोटीपर्यंत वाढल्या. पण ही वाढ जशी खासगी बँकांतून झाली तशी पोस्टाचे ठेवीमध्यें मात्र झाली नाहीं. उलट युद्धारंभीं पोस्टल सेव्हिंग्जमध्यें १४१ कोटींच्या ठेवी होत्या, त्या १९४१–४२ मध्यें ४६ कोटींनीं कमी होऊन, ९५ कोटीच अवघ्या राहिल्या.

अर्थात या सर्वांचा निष्कर्ष एवढाच कीं देशांतील उत्पादन, पुरवठा व विनिमय यांच्या घडामोडीस, वरील कागदी नोटांचा झालेला वर्षाव सहन

न झाल्यानें, साहजिकच पैशाची किंमत घसरली व व्यवहारांत महागाई प्रतिदिनीं वाढूं लागली. हें अमर्याद बिनबुडाच्या चलनवाढीचें सरकारचें धोरण पुढें असेंच चालूं राहिल्यास देशावर फार अनिष्ट प्रसंग ओढवेल असा इषारा नुकताच देशांतील वीस सुप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञांनीं दिलेला सर्वांना विदितच आहे. सध्याच्या महर्गतेस हें जें एक जबरदस्त कारण आहे त्या वादास प्रथम मुंबईचे सुप्रसिद्ध प्रा. सी. एन्. वकील यांनीं 'रुपयाचा उतरता भाव' (The Falling Rupee) नामक प्रबंध लिहून चालना दिली व तेथपासून या वादास देशांत चांगलाच रंग भरला आहे. या वादामध्यें सरकारनेंहि आत्मसमर्थनार्थ बाजू मांडली आहे, त्या सर्वांचा उहापोह पुढील प्रकरणांत करूं.

कागदी नोटांचा बेगडी डोलारा

चलनवाढीबाबत सरकारी दृष्टिकोण.

कागदी चलनवाढीबाबत सरकारी दृष्टिकोण, येथील रिझर्व्ह बँकेचे नुकतेच दिवंगत झालेले गव्हर्नर मि. टेलर यांनीं ऑगस्ट १९४२ मध्यें केलेल्या भाषणावरून उघड झाला आहे. ते म्हणाले " येथील चलन अमर्याद प्रमाणाबाहेर वाढलें हा आक्षेप खोटा आहे. केवळ महर्घता वाढली, म्हणून त्याच्याशीं चलनवाढीचा बादरायणी संबंध जोडणें चुकीचें आहे. ब्रिटिश सरकारनें स्वतःकरितां व दोस्तराष्ट्राकरितां जी अवाढव्य मालाची खरेदी लष्करी कारणाकरितां केली, त्याच्याबदली ते स्टर्लिंग पौंड देतात व तें देणें भागविण्यास सरकारला नवीन चलन काढावें लागत आहे." सरकारी धोरणाचा जणूं सूरच ओढण्याकरितां कीं काय, प्रा. वकील यांच्या पुस्तकास उत्तर म्हणून मुंबईच्या टाईम्समध्यें मि. एल्. नेमनई यांनींहि *Expansion or Inflation* नामक एक लेख लिहून, सरकारी दृष्टिकोण विशद करण्याचा प्रयत्न केला आहे. ती बाजू अगोदर पाहून मग प्रा. वकील यांच्या संयुक्तिक व सशास्त्र टीकेचा विचार करूं.

मि. नेमनई असें म्हणतात " सध्याच्या महागाईस अमर्याद चलनाची वाढ हें एकच एक कारण आहे, हा आक्षेप खोटा असून, हिंदुस्थान सरकारचें सध्याचें चलनविस्ताराचें धोरण योग्य, कायदेशीर व इष्ट असें आहे. त्यामुळें घाबरून जाणेचें मुळींच कारण नाहीं. कारण या वाढत्या चलनास भरपूर तारण आहे. "

बिनबुडाचें चलन

आपण मागील कोष्टकांत असें पाहिलें कीं निधीमध्यें असलेल्या ४४ कोटी सुवर्णामध्यें गेल्या तीन वर्षांत मुळींच वाढ झालेली नाहीं. स्टर्लिंग पौंडाचे रोखे मात्र युद्धारंभीं ६१ कोटींचे होते, ते २१ मे १९४३ ला ५२९ कोटीपर्यंत वाढले. रुपयांतले रोखेहि ३७ कोटीपासून १२५ कोटीपर्यंत वाढले व रोकड रुपये मात्र ७६ कोटी पासून १२ कोटीपर्यंत कमी झाले. रुपयांचे रोखे एकंदर जिंदगीच्या शेंकडा २५ टक्के अगर ५० कोटी यांपैकीं जी रक्कम अधिक होईल त्यापेक्षां अधिक होता कामा नये, हा असलेला निर्बंध सरकारनें १९४१ फेब्रुवारींत वट्टहुकूमानें काढून टाकल्यानें, ते शेकडा ३० पर्यंत वाढले. यावरून प्रा. वकील यांनीं असा सिद्धांत मांडला कीं, वाढत्या रुपयांच्या नोटांना भरपूर तारण नसल्यानें, ही वाढ बिनबुडाची झालेली आहे व अशी फाजील अवास्तव वाढ पुढें चालू ठेवण्यांत देशावर अनर्थपरंपरा कोसळणार आहे.

मि. नेमनईची मीमांसा

यास उत्तर म्हणून मि. नेमनई म्हणतात " प्रा. वकीलांची धास्ती अकारण आहे. गेल्या अनेक वर्षांत निधींतील सुवर्णसंचयांत बिलकूल भर पडली नाहीं हें खरें. पण त्या ४४ कोटी रुपयांच्या सुवर्णाची किंमत, आजच्या सोन्याच्या बाजारभावाप्रमाणें १३३ कोटी रुपये केली पाहिजे. कारण ती किंमत दर तोळयास २१ रु. ३ आणेप्रमाणें आकारून ठरविण्यांत आलेली आहे. त्याची फेब्रुआरींत सोन्याच्या ६६।६७ च्या भावानें वाढलेली किंमत नको का जमेस धरावयास ? तेव्हां आजच्या चलनवाढीस सुवर्णाचा भरपूर पाठिंबा नाहीं, हा प्रा. वकीलांचा आक्षेप आपोआप लंगडा पडतो. कायद्यानें कागदी चलनाच्या निधींत, स्टर्लिंग पौंडाचे रोखे अमुक

इतकेंच ठेवले पाहिजेत असें बंधन नाहीं. आज त्या रोख्यांचें तारण शेंकडा ८१ पडते. रुपयांच्या रोख्यांतहि वाढ झालेली दिसते, पण मुळची वाढलेली किंमत जमेस धरली म्हणजे रुपयांच्या रोख्यांचें तारण शेंकडा १६॥ टक्केच पडते. आज विलायतेंत स्टर्लिंग पौंडाचे रोखे ३३५ कोटी रुपयांचे आहेत. इतके रोखे ठेवणें चांगलें का वाईट हा मतभेदाचा प्रश्न आहे. इतके दिवस हिंदुस्थानचा व्यापार आंतबट्ट्याचा होता, तो या लढाईच्या दिवसांत फायद्याचा झाला आहे. विलायतेहून येणारीं यांत्रिक साधनें व पक्क्या मालाची प्रचंड आयात थांबल्यानें व खुद्द विलायतेकडे मात्र येथून कोट्यावधि रुपयांच्या मालाची निर्गत होत असल्यानें, हिंदुस्थान हा इंग्लंडचें सर्व देणें फेडून, आज धनको बनला आहे. १९३८–३९ मध्यें ४६९ कोटी रुपयांचें हिंदुस्थाननें ब्रिटनचें असलेलें देणें, १९४१–४२ मध्यें १८० कोटी रुपायांपर्यंत खालीं आलें आहे, तें सारें एव्हांना फिटूनहि गेलें. आजच्या परिस्थितींत इंग्लंड हिंदुस्थानच्या ३५५ कोटी रुपयांच्या कर्जांतच आहे.

" तेव्हां अशा सुस्थितींत हा देश असतां, येथील कागदी चलन बेसुमार फुगलें आहे, ही ओरड व्यर्थ आहे. चलन बिनबुडाचें होऊन अवास्तव फुगणें, याचीं विविक्षित लक्षणें आहेत. कागदी चलन केवळ सरकारी सत्तेच्या जोरावर भरमसाट वाढविणें, कागदी नोटांचा व्यवहारांत सुळसुळाट होणें, त्यास चांदी-सोन्याचा भरपूर पाठिंबा नसणें, रिझर्व बँकेच्या घटनेंत सांगितलेल्या मर्यादा ओलांडल्या जाणें, इ. त्याचीं लक्षणें होत. याचें अखेर पर्यवसन देशाचीं बजेटें दिवाळखोरीचीं बनण्यांत होतें. थोडक्यांत, बिनकिंमतीच्या तारणाच्या आधारावर कागदी नोटा प्रसृत होणें, हेंच चलन फुगण्याचें मुख्य लक्षण. त्यामुळें बाजारभाव कडाडून जाणें हा त्याचा दृश्य परिणाम आहे. पण आजची महागाई चलन फुगविल्यामुळें अत्यंत वाढली हा

आक्षेप मात्र चुकीचा आहे. कारण महर्गतेस चलनाशिवाय अन्य कारणें असूं शकतात, हें केव्हांहि दृष्टिआड करून भागणार नाहीं."

" युद्धकालांत चलनविस्तार अपरिहार्य खरा, पण त्याचें अधिष्ठान भक्कम पायावर आहे कीं नाहीं हें पाहणें भाग असतें. खुद्द हिंदुस्थानांत व देशाबाहेर युद्धकारणास्तव येथील मालाला असलेली विपुल व निकडीची मागणी, परदेशाहून येणारा माल बंद, वहातुकीच्या साधनांची कमतरता, प्रांतिक सरकारें व संस्थानें यांच्यामध्यें सहकार्याचा अभाव इ. इ. विविध गोष्टी हिंदुस्थानांतील आजच्या महागाईस कारणीभूत आहेत. युद्धकालांतील भयग्रस्त मानसिक ठेवणीमुळें, बाजारभावांत भयंकर आंदोलनें निर्माण होऊं शकतात. लोक आपल्या गरजेपेक्षां अधिक मालाचा सांठा करून, परिस्थिती अधिक बिकट करून घेतात. त्यांत भयभीत वातावरणाचा फायदा उकळण्यास सोकावलेले व्यापारी, भारी किंमतीचे जुगारी सौदे खेळून व चोरबाजार उघडून, लोकांना लुबाडतात ते निराळेंच."

कागदी चलनास आधार कोणता ?

चलनविस्ताराव्यतिरिक्त जीं कारणें मि. नेमनई यांनीं उधृत केलीं आहेत, त्यांचा विचार पुढें होईल. आज व्यवहारांत कागदी नोटांचा सुळसुळाट झाला आहे, हें कांहीं सांगावयास नको. रिझर्व बँकेनें विशेषतः गेल्या वर्षापासून चलन खूपच व्यवहारांत आणून सोडलें, तो पैसा लोकांच्या हातीं गरजेशिवाय राहिला; व तो पैसा लोकांनीं बँकांतून शिलकी टाकला नाहीं, या गोष्टीं उघड आहेत. कोणतेहि कागदी चलन बिनबुडाचें का स्थिरबुडाचें हें ठरविण्याची एक सोपी युक्ति, निदान हिंदुस्थानांत उपयोगी पडण्यासारखी आहे. ज्या मानानें त्या कागदी चलनास धातूमय चलनाचा पाठिंबा असेल, त्यावर हें सारें अवलंबून. या

कसोटीनें युद्धारंभीं ज्या कागदी चलनास शेंकडा ५५ टक्के धातूमय चलनाचा व धातूचा आधार होता, तो सुवर्णाची वाढलेली किंमत जमेस धरूनहि, आज शेंकडा २० टक्केपर्यंत घसरलेला दिसेल.

गेल्या युद्धाशीं तुलनात्मक दृष्टीनें पाहिल्यास असें आढळून येईल कीं, मार्च १९१४ मध्यें या देशांत ६६ कोटी १२ लाख रुपयांच्या नोटा व्यवहारांत प्रचलित होत्या, त्या १९२० च्या जानेवारीत १८५ कोटी १५ लक्षापर्यंत वाढल्या. गेल्या युद्धांत येथील लोकांना धनधान्यादि पदार्थांच्या महर्गतेची जाणीव हल्लीं इतकी तीव्रतेनें मुळींच झाली नाहीं. युद्धानंतर १९१९–२१ च्या संधिकालावर सुमारें सात आठ महिने महागाईची धारण लोकांना थोडीबहुत जाणवली, ती युरोपांतील अन्नान्नदशा वांचविण्यासाठीं प्रचंड निर्गत झाली म्हणून. पण शेतकीचा मोसम सुरू होताच परिस्थिति निवळली. पण चालू युद्धांतील सारेंच प्रकरण न्यारें !

रुपयाचा स्टर्लिंग पौंडाशीं पाट

त्यांत चालू चलनवाढीस्तव जें स्टर्लिंग पौंडांचे रोखे खरेदण्याचें धोरण सरकारनें अंगिकारलें आहे, तें हिंदुस्थानच्या फारशा हिताचें नाहीं, असें म्हणणें भाग पडतें. इत:पर इंग्लंडचें सर्व देणें फिटल्यावर, या कागदी पौंडाची रास विलायतेंत रचून ठेवणें, व त्याच्या आधारावर इकडे नोटा भराभर छापून बाहेर पडणें हें इष्ट ठरणार नाहीं, अशी साधार भीति प्रा. वकीलांनीं प्रगट केली आहे, व ती रास्तहि आहे. रिझर्व बँकेच्या घटनेंत निधीमध्यें पौंडातल्या रोख्याना इतकं महत्वाचें स्थान मिळण्याचें कारण त्यावेळेस विलायती पौंड सोन्याचा होता. हिल्टनयंग कमिशननें एवढ्याचसाठीं अशी शिफारस केली होती. त्यावेळेस पौंडाच्या बदली ठराविक सोनें देण्यास बँक ऑफ इंग्लंड बांधली

गेली होती. पण १९३१ च्या आर्थिक हलाखीच्या भोंवऱ्यांत ब्रिटनने आपले जवळचें सुवर्ण, सुवर्णपरिमाण राखण्याच्या यत्नापायीं गमावलें. अखेर सुवर्णपरिमाण सोडावें लागलेंच, व पौंड कागदी (स्टर्लिंग) करण्यांत आला. पण या कागदी पौंडाशीं रुपयाचा पाट १८ पेन्साच्या भावानें कायम ठेवण्यांत आला. इंग्लंडच्या पौंडाइतका येथील रुपाया घसरला नव्हता, यामुळें हा पाट हिंदुस्थानास बाधक झाला. हा कायम ठेवला गेला नसता, तर जर्मनींतील मार्क नाण्याप्रमाणें इंग्लंडच्या पौंडाचा बोजवारा उडाला असता. या पाटामुळें घसरगुंडीस लागलेल्या पौंडाची अब्रू सावरण्यासाठीं, हिंदुस्थानास १९३८ अखेर सुमारें ३१० कोटी रुपये किंमतीच्या सोन्यास मुकावें लागलें. १९३१ पासून १९४० पर्यंत दर आठवड्यास लाखों रुपये किंमतीचें मिळून ५००।६०० कोटींचें सुवर्ण हिंदुस्थानचा किनारा सोडून कायमचें गेलें, त्याचें रहस्य हें आहे.*

अशा दिवाळखोर कागदी पौंडाचें (स्टर्लिंग) रोखे विकत घेऊन संचय करणें हितावह ठरेल काय ? कारण युद्धानंतर कागदी पौंडाची आज असलेली किंमत कायम राहील याची काय शाश्वति ? ते पौंडातले रोखे कागदी नसते तर या आक्षेपास मुळींच जागा नव्हती. युद्धानंतर अँग्लो–हिंदी व्यापार खुला झाला कीं पौंडाची आजची १८ पेन्साची किंमत कमी होत जाईल आणि पुनःश्च हा १८ पेन्सचा भाव टिकविण्याच्या अट्टाहासांत, आज विलायतेंत सांचत असलेल्या सर्व कागदी पौंडांचा फन्ना उडेल अशी साधार भीति वाटते. तसेंच व्यवहारांतील खेळते चलन युद्धानंतर आंखडते घेण्याच्या यत्नांत, हिंदुस्थान पुनः एकवार १९३१ पेक्षाहि अधिक बिकट अशा आर्थिक हलाखीच्या भोवऱ्यांत गटांगळ्या खाईल, तें निराळेंच.

---

* अधिक माहितीसाठीं ' सह्याद्रि ' मासिक, सप्टेंबर १९३९ च्या अंकांतील याच लेखकाचा " हिंदुस्थानांतील सुवर्णनिर्गत " हा लेख पहा.

शेठ बिर्ला व सरमेहता यांचीं मतें

कागदी पौंडाच्या अनिश्चित भवितव्याबद्दल प्रा. वकील यांनीं प्रगट केलेली भीति साधार आहे, हें कोणासहि मान्य करावें लागेल. " **बिनबुडाच्या कागदी चलनाची वाढ व वस्तूंचें दुर्भिक्ष्य** " नामक निबंध, हिंदी व्यापारी कारखानदार संघाच्या मध्यवर्ति संस्थेचे एक प्रमुख नेते शेठ घनःश्यामदास बिर्ला यांनीं लिहिला आहे. त्यांत सध्यां कागदी पौंडाची किंमत घसरलेली नसल्यानें, त्याच्या तारणावर कागदी चलन काढण्यास कांहीं प्रत्यवाय नाहीं असें मत प्रगट केलें आहे पण युद्धोत्तर स्टर्लिंगची किंमत घसरण्याचा बराच संभव असल्यानें, सध्यां विलायतेंत जो बाजारभाव आहे, त्या हिशोबांत कागदी पौंडाच्या शिलकीचा हिशोब व्हावा. व युद्धोत्तर आजच्या धारणीनेंच कागदी पौंडास माल मिळेल अशी हमी ब्रिटिश सरकारनें द्यावी असें त्यांनीं प्रतिपादलें आहे. तसेंच मुंबईचे सर सी. बी. मेहता यांनींहि आपलें मत प्रतिपादलें आहे. ते म्हणतात " हिंदुस्थानचे नांवे जे कागदी पौंडधन विलायतेंत जमा होत आहे, त्याबद्दल मला भीति वाटते. युद्धोत्तरकालीं स्टर्लिंगचा भाव उतरला तर काय घ्या ! स्टर्लिंगचा भाव न जाणों उतरल्यास, योग्य ती नुकसानभरपाई दिली जाईल असें आश्वासन ब्रिटनकडे मागणें इष्ट व योग्य होईल. अशा प्रकारचें आश्वासन अर्जेंटाईन सरकारला ब्रिटननें दिलें व तें स्वीकारलेंहि गेलें. अमेरिकेसहि असें आश्वासन दिले गेले आहे. आज रुपायाचे चलन सर्व जगांत खंबीर आहे, म्हणून असा आग्रह धरणें जरूर आहे. "

तुलनात्मकदृष्टीनें विचार केल्यास शेठ बिर्लासाहेब अगर सर मेहता यांच्या विचारसरणीपेक्षां, प्रा. वकीलांनीं या याबाबत अनेक सूचना केल्या आहेत (त्यांचा विचार पुढें येईल), त्या अधिक उपयुक्त खास वाटतील.

शेठ त्रिर्ला व सर अगर मेहेता यांच्या सूचनेनुसार ब्रिटन आश्वासन देणेस तयार होईल कीं कसें याबद्दल साशंकता वाटते. कारण ब्रिटनमध्यें आतापासूनच युद्धकार्यार्थ हिंदुस्थाननें उदारमनानें सर्व स्टर्लिंग रोख्यांची देणगी द्यावी अशी शिकवण सुरू झाली आहे. यावरून वारें कोणत्या दिशेने वहाते ते सहज समजण्यासारखें आहे.

हिंदुस्थानच्या कर्जाचा हिशोब

हिंदुस्थाननें इंग्लंडपासून घेतलेले कर्ज दोन प्रकारचे आहे. त्यापैकीं एक हिंदुस्थानसरकारचे असून, ते युद्धारंभी सुमारें ४६९ कोटींचे होते व ते एव्हांना सारें फिटून गेले आहे, हे आपण वर पाहिलेच. म्हणजे हिंदुस्थान सरकार इंग्लंडच्या कर्जातून मुक्त झाले; ही एक गोष्ट हिंदुस्थानच्या फायद्याची झाली, असें म्हणण्यास हरकत नाहीं. पण सरकार व्यतिरिक्त येथील लोकांनी वा संस्थानीं इंग्लंडमध्यें काढलेले कर्ज शिल्लक आहेच. त्याचा नक्की आंकडा सांगणे अशक्य आहे, पण ते सुमारे एक हजार कोटी तरी खास असावें. याशिवाय हिंदुस्थान सरकारनें खुद्द याच देशांत कर्ज काढलेले आहे ते निराळें. हे रुपयांतील कर्ज एक हजार कोटी रुपयापर्यंत भरेल, हेंहि लक्ष्यांत ठेवणें भाग आहे. पण हिंदी सावकार धनाढ्य होत चालला ही गोष्ट तितकीशी आक्षेपार्ह वाटत नाहीं; याचें कारण त्यायोगें इंग्लंडच्या कर्जाच्या व्याजापायी येथून पुष्कळ पैसा दरवर्षी परदेशी जात होता, तो आतां वांचणार हे होय.

रुपयाचीं स्थित्यंतरें

हा झाला कागदी चलनाबाबत उहापोह. याशिवाय हिंदुस्थान सरकारनें इथें धातूमय चलनांत कसकसे फेरफार केले तेंहि अभ्यासण्याजोगें

आहे. व्हिक्टोरिया राणीच्या अमदानींत १८९३ पासून चांदीच्या रुपयाचा इतिहास पाहूं. त्यावेळेस रुपायांतील चांदी नामक धातूची किंमत व त्याची कायद्यानें ठरविलेली किंमत यांत फारसा फरक नव्हता. यामुळें त्या वेळेस रुपये वितळून चांदी करणें अगर चांदी टांकसाळीत नेऊन रुपये पाडून घेणें, ही सुलभ सनदशीर पद्धत चालू होती. कोणत्याहि नाण्याचे त्याच्या अंगच्या धातूचें मोल व त्याची कायद्यानें ठरविलेली किंमत एक असणें, हें आदर्शभूत स्वरूप गणलें जाई, तें आमच्या रुपयास त्यावेळेस होतें. पण त्यापुढें जसजसें चांदीची किंमत उतरत गेली, तसें "चांदीच्या पत्र्यावर बादशहाचा छाप उठविलेल्या नोटे" चे स्वरूप त्या रुपयास प्राप्त झालें. रुपयाचें वजन १८० ग्रेन्स, त्यापैकी १६५ ग्रेन्स शुद्ध चांदी व बाकीचें मिश्रण असे त्याचें स्वरूप. गेल्या युद्धांत चांदीची किंमत अमर्याद वाढली, त्यावेळेस सरकारनें व्यवहारांतील खेळते रुपये परत घेणेचा मार्ग अनुसरला नाहीं. कारण त्या काळीं लोकांचा कागदी चलनावर बिलकुल विश्वास नव्हता. तेव्हां सरकारनें रुपयाचे सोन्याशीं असलेलें किंमतीचे प्रमाण वाढविलें. पण रुपये वितळून चांदी विकणें किफायतशीर होऊं लागल्यानें, रुपयाचें चलन व्यवहारांतून कमी होऊं लागलें. चालू युद्धांतहि चांदी महाग होऊन, रुपयाची दर्शनी व अंगची किंमत एक होणार असा रंग दिसताच, सरकारनें आगाऊ व्हिक्टोरिया, सातवे एडवर्ड, पाचवें व सहावें जॉर्ज छापाचे शुद्ध चांदीचे रुपये व्यवहारांतून काढून घेण्याची बेमालूम युक्ति अंगिकारली; व त्याचे बदली निम्मी चांदी व निम्मी भेसळ अशा नवीन मिश्रणाचा रुपाया नाणें व्यवहारांत थोड्याप्रमाणांत आणून सोडलें. सरकारच्या या दूरदर्शित्वामुळें कितीसे रुपये सरकारी खजिन्यांत परत आले व किती रुपये लोकांनीं दडपून ठेवले, हें सरकारनें प्रसिद्ध केल्याविना कळण्यास अन्य मार्ग नाहीं. लोकांनीं रुपये आटवून

चांदी करूं नये म्हणून सरकारनें घेतलेल्या या दक्षतेमुळें, व्हिक्टोरिया व सातवे एडवर्ड छापाचे बरेच रुपये सरकारला मिळाले असावेत. पण एप्रिल महिन्यापासून सोन्याचांदीचे बाजार भयंकर कडाडून गेले असल्यानें, पांचवे व सहावे जॉर्ज छापाचे फारसे रुपये सरकारच्या हातीं लागलें असण्याचा संभव दिसत नाहीं.

चिल्लर मोडीची कृत्रिम टंचाई

तसेंच चिल्लर नाण्यांच्या मोडीपायीं जनतेस पदोपदी किती त्रास व नडणूक सहन करावी लागत आहे, त्याचें वर्णन नलगे. तांबे, शिसें, जस्त वगैरे धातूंच्या किंमती भरभसाट वाढल्यानें ही चिल्लर नाणीं गडप होत असावीत असें वाटते. गेल्या युद्धांतहि पांच कोटी रूपयांची नाणीं गडप झाल्याचा दाखला आढळतो. १९४२ अखेर सरकारनें २१३ कोटी १० लाख किमतीची दुय्यम नाणीं सरकारनें पाडून व्यवहारांत आणली. पण यांपैकीं १९४० मध्यें ४ कोटी, १९४१ मध्यें ५ कोटी तर १९४२ मध्यें १० कोट रुपयांचीं नाणीं किमानपक्षीं गडप झाली असावीत असा अंदाज आहे. पण ही चिल्लर हलक्या नाण्यांची टंचाई कृत्रिम व खोटी आहे. तसें पाहिलें तर मोठमोठ्या पासून छोट्या व्यापाऱ्यापर्यंत सर्वांनीं, हीं चिल्लर नाणीं संचय करून ठेवून लोकांची निष्कारण कुचंबणा केली आहे. एरव्ही चिल्लर नाण्यांची टंचाई वस्तुतः भासावयास नको आहे. येथील टांकसाळी शक्य तितक्या चिल्लर नाण्यांचा पुरवठा करूं शकत नाहींत हें एक कारण आहे. याचें कारण गेले दोन वर्षें येथील टांकसाळीनी ऑस्ट्रेलियासारख्या देशाकरितां नाणीं पाडून पुरविण्याचा मक्ता घेतल्याचें सरकारनें जाहीर केलें आहे. याचाहि परिणाम चिल्लर नाण्यांच्या पुरवठ्यावर होणें स्वाभाविक आहे.

एप्रिल १९४३ महिन्यांत चलनविषयक अधिकाऱ्यांच्या अंदाजा-

प्रमाणें जास्तीत जास्त चिल्लर नाणीं टांकसाळींतून बाहेर पडली. दर महिना सुमारें ९० लक्ष पैसे हें तांब्याचें नाणें निघत असूनहि, त्याचा मागमूस व्यवहारांत आढळू नये, याबद्दल खुद्द सरकारलाच आश्चर्य वाटत आहे. एकंदरींत, जोंवर नाण्यांमध्येंच संपत्ति दडलेली आहे अशी खोटी कल्पना उराशीं बाळगून हिंदी मनुष्य आहे, तोंवर संचयाची अनिष्ट प्रथा तो सोडणार नाहीं. यावेळेपावेतों केवळ कागदी चलनाच्या वाढीचाच विचार केला. चिल्लर नाण्यांच्या स्वरूपांत चलनामध्यें जी ही प्रचंड भर पडत आहे, त्यामुळें व्यवहारांतील चलन जास्तच फुगत असल्यास नवल नाहीं.

चलनांतील फेरफार

याच्याच जोडीस हिंदुस्थान सरकारनें गेल्या दोन वर्षांत चलन. विषयक केलेले फेरफार क्रमवार तारखांसह देतो, म्हणजे पुरी कल्पना येईल-

१. एप्रिल १९४० — चांदीच्या पावलींतील शुद्ध चांदी निम्मी करण्यात आली.

२. २५ जानेवारी १९४० – गरजेपेक्षां जास्त नाणें जवळ ठेवणें हा गुन्हा असल्याचा वटहुकूम जारी.

३. २४ जुलै १९४० — एक रुपायाच्या कागदी नोटा प्रसृत झाल्या (त्याची किंमत चांदीच्या रुपयाबरोबर ठरविली. पण त्याच्या बदली चांदीचा रुपाया मिळणेचा नाहीं.)

४. २६ जुलै १९४० — अधेलींतील $\frac{11}{12}$ चांदीपैकीं निम्मी कमी करण्यात आली.

५. २३ डिसेंबर १९४० — रुपायांतील $\frac{11}{12}$ शुद्ध चांदी निम्म्यानें कमी केली.

६. ८ फेब्रुवारी १९४१— कागदी चलनाच्या निधींत रुपयाचे रोखे ठेवण्याची मर्यादा वटहुकूमानें काढून टाकण्यांत आली.

७. एप्रिल १९४१— व्हिक्टोरिया छापाचे रुपये काढून घेणेत आले.

८. जानेवारी १९४२— नवीन दोन पैशाचे चौकोनी नाणें काढले गेले. व आणेल्या व दुणेल्या निकेल ब्रासच्या काढल्या.

९. ३१ मे १९४२— सातवे एडवर्ड छापाचे रुपये काढून घेणेंत आले.

१०. २३ जानेवारी १९४३–नवीन भोंकाचा पैसा काढला गेला. (पूर्वीचा पैसा ७५ ग्रेन्सचा होता, नवीन ३० ग्रेन्सचा निघाला.)

११. फेब्रुवारी १९४३— दोन रुपयेवाल्या तांबड्या रंगात छापलेल्या नोटा निघाल्या.

१२. २१ मे १९४३— पांचव्या व सहाव्या जॉर्ज छापाचे शुद्ध चांदीचे रुपये चलनांतून कमी होण्याची शेवटची तारीख.

यापुढें चलनांत कसकसे फेरफार विधिलिखित आहेत ते कोण व कसें सांगू शकणार ?

युद्धखर्चाचे विश्वरूपदर्शन

सूज का पुष्टता ?

गेल्या प्रकरणांत आपण सध्याची चलनवाढ ही चलनविस्ताराच्या सदरांत पडते का चलन फुगविणेच्या सदरांत पडते, तें आपण पाहिलें. दोहोंमध्यें पुष्टता व सूज इतकें महदंतर आहे. युद्धकालांत चलनविस्तार अपरिहार्य हें खरें. पण आज कागदी चलनाचा एवढा मोठा वर्षाव होत आहे कीं त्यामुळें लोकांच्या हातांत जाणारे व व्यवहारांत खेळणारे चलन रोजच्या दैनंदिन देवघेवीस मुळींच आवश्यक नसल्यानें, खाद्य पदार्थांचा अपुरा असलेला पुरवठा हस्तगत करण्याकडे त्याचा विनियोग केला जात आहे. व याचा परिणाम रोज महर्गता वाढत्या श्रेणीनें लोकांना जाचक होत चालली आहे. जनतेच्या हातांतील वस्तू विकत घेण्याची चलनरूपी शक्ति मर्यादित राहील, तरच पैसा आणि वस्तू यांचे परस्पर प्रमाण स्थिर राहून, बाजारभावांत रोज होणाऱ्या घालमेलीस थोडातरी आळा बसेल. उपमेनें असें म्हणता येईल कीं पिकाकरितां पावसाची अत्यंत गरज आहे खरी, पण पिकाच्या परिस्थितीप्रमाणें तो पावसाळ्यांतील झिमझिम पडणारा पाऊस हवा. सध्याचा पाऊस म्हणजे सोसाट्याच्या वारा सुटून, सर्व भूमींतील सकसपणा धुवून नेणारा मुसळधार वळवाचा असल्यानें, पिकास अत्यंत बाधक आहे. तीच स्थिति आज कागदी नोटाबाबत झालेली आहे.

युद्धखर्च चालविण्याच्या जुन्या नव्या कल्पना

कालप्रमाणें युद्धाचें स्वरूप जसें पालटलें, तसें त्याचा खर्च चाल-

विण्याच्या कल्पनाहि बदलल्या. पूर्वीची युद्धें मर्यादित स्वरूपाची अतएव लहान प्रमाणावर बहुतांशीं राजेलोकांच्या लहरीनुसार चालत. तेव्हां लढाईला लागणारे सैनिक, शस्त्रास्त्रें, अन्न, वगैरे साधनें सर्वसाधारण समाजजीवनास फारसा उपद्रव न पोंचता जमा होत असत. पण आताची युद्धें म्हणजे एका संघटित राष्ट्रानें दुसऱ्या संघटित राष्ट्राविरुद्ध चालविलेले झगडे होत. विशेषतः चालू युद्ध केवळ राष्ट्रीय नसून, तें लोकयुद्धहि असल्यानें; त्यानें राक्षसी जगड्व्याळ स्वरूप धारण केलें. अशा सर्वभक्षक युद्धाचा बोजा व परिणाम आज त्या त्या राष्ट्रांतील सर्व नागरिकांवर होणें अपरिहार्य आहे. जुन्या कालांत युद्धाचा खर्च मुख्यतः कर्जाच्या उभारणीनें चालविला जाई. व्याजाचा दर वाढवून कर्ज उभारणें हा राजरोस मार्ग होता. वाढत्या व्याजाच्या दरानें लोकांच्या हातीं अधिक पैसा खेळूं लागला कीं बाजारभाव चढूं लागत. या युक्तीनें पुरेसा पैसा युद्धखर्चास्तव सरकारास मिळेनासा झाला कीं, सरकार नवीन चलन काढून वेळ निभावून नेई. युद्धकालांत नवीन चलन निर्माण करून, व्यवहारांतील चलन वाढविणें म्हणजे पर्यायानें लोकांवर अप्रत्यक्ष कर लादण्याप्रमाणेंच होय. लोकांच्या हातीं यायोगें अधिक पैशाचा पुरवठा करण्यानें मालाच्या किंमती वाढतात, त्यायोगें लोकांना कमी माल खरेदी करणें भाग पाडले जाते व सरकारला तो माल युद्धकार्यार्थ उपलब्ध होतो. लोकांच्या उत्पन्नाला कररूपानें कात्री लावण्याने, लोक नाखुष होतात. पण या चलन फुगविण्याच्या मार्गानें त्यांना ‘ सक्तीची बचत ’ करण्यास लावल्यानें, सरकारचा कार्यभाग साधला जातो. जगप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ लॉर्ड कीन्सनीं या चलन फुगवून महर्गता वाढविणें व त्यांतून युद्धखर्च व युद्धास लागणारीं साधनें मिळविणें या मार्गाची तरफदारी केली आहे.

पण हा सर्वमान्य मार्ग आज हास्यास्पद ठरण्याचा प्रसंग युद्धाच्या

बदलेल्या स्वरूपामुळें आला आहे. हल्लीच्या लोकयुद्धांत राष्ट्राच्या गरजांना नागरिकांच्या वैयक्तिक गरजांपेक्षां अग्रेसरत्व प्राप्त झालें असून, वाढत्या किंमती, कर व कर्ज इत्यादि गोष्टींबरोबर देशांतील उत्पादनांतील अमुक इतका हिस्सा सरकारला मिळालाच पाहिजे, असें ते हुकूमाच्या जोरावर अंमलांत आणूं शकतात. युद्धखर्चापायीं लागणारा सर्व पैसा व साधनें लोकांकडून कर, सक्तीचें कर्ज व सक्तीची बचत या त्रिविध मार्गानें मिळविणें हा चालू लोकयुद्ध चालविण्याचा राजमार्ग गणला जात आहे. युद्धाच्या दृष्टीनें अनवश्यक अशा उत्पादनास कांट देणें, युद्धोपयोगी उत्पादनाला भरपूर चालना देणें आणि त्यांतील हवा तेवढा हिस्सा सक्तीनें पैदा करणें व राहिलेल्या उत्पादनांत नागरिकांना आपल्या गरजा भागविण्यास फर्मावणें, इत्यादि गोष्टी हल्लीचे सरकार राजरोस करूं शकते. देशांतील मर्यादित उत्पन्न होणारा माल ठराविक किंमतीनें ठराविक प्रमाणांत सर्व नागरिकांना सारख्या प्रमाणांत मिळाला, म्हणजे तंटेबखेडे, गैरसोई व लोकक्षोभ इत्यादि गोष्टी समाजांत होत नाहींत; हें इंग्लंडनें स्वतःचा कित्ता घालून सर्व जगाला दाखविलें आहे. या युद्धखर्च चालविण्याच्या धोरणामुळें चलन फुगविण्याचा प्रसंग सरकावर येत नाहीं आणि महर्गतेमुळें उपासमारीचा प्रसंग नागरिकांवर येत नाहीं. पूर्वीच्या युद्धांत युद्धखर्च केवळ कर्जाच्या मार्गानें चालविला जाण्यानें, व्यापारी, कारखानदार वगैरे लोकांची चंगळ उडे, व अशा लोकांकडूनच सरकारला कर्ज मिळाल्यानें, तें वर्षांनुवर्षं फेडीत बसण्याचा बोजा मात्र निष्कारण सर्वसामान्य जनतेवर पडे. त्याऐवजीं राष्ट्राच्या व लोकांच्या गरजांचा पुरवठ्याशीं मेळ घालून, बहुसंख्य सामान्यजनतेकडून सक्तीच्या कर्जाच्या व सक्तीच्या बचतीच्या मार्गानें व श्रीमंत लोकाकडून भरपूर कराच्या मार्गानें, युद्धकार्यासाठी लागणारा पैसा व शस्त्रास्त्रें, अन्न वगैरे साधनें मिळविणें, हे

चालू लोकयुद्ध चालविण्याचें अभिनव यशस्वी धोरण म्हणून आज सर्वमान्य ठरलें आहे.

जर्मनीचें उदाहरण.

कोणी म्हणतील कीं काढल्या जास्तीकमी नोटा म्हणून काय बिघडतें ? सत्तेचा छापखाना आहे म्हणून लग्नचिठ्या छापल्याप्रमाणें नोटा भराभर छापणें परिणामीं घातक ठरतें. फ्रेंच भाषेंत अशी म्हण आहे कीं अशा बेपर्वाईनें नोटा छापण्याच्या यंत्रामागोमाग, शिरच्छेद करणारें यंत्र गुप्तपणें कार्य करीत असतें (Guillotine follows the paper money press, the two machines are complimentary to one another) गेल्या महायुद्धापासून हा कटु अनुभव युरोपियन राष्ट्रांनीं संपादला असल्यानें, तो अनुचित मार्ग चालू युद्धांत त्यांनी अनुसरलेला नाहीं. गेल्या युद्धानंतर युद्धकर्ज फेडतां येईना म्हणून त्या राष्ट्रांनीं कांखा वर केल्या, कोट्यावधि किंमतीचें सुवर्णास सुकले व १९३१ जागतिक हलाखीच्या गर्तेंत भयंकर हालअपेष्टा सहन कराव्या लागल्या. हा इतिहास अगदी ताजा आहे. जर्मनींतील नात्झी तत्त्वज्ञानाचा उदय याच परिस्थितींतून झाला आहे. युद्धखर्चासाठीं त्यांनी ऐनयुद्धाच्या धामधुमींत कागदी चलन भरमसाट फुगविलें, व युद्धानंतर देशांतील उत्पादन खालावल्यामुळें पैशाचा सुळसुळाट कमी करण्यासाठीं, चलन आंखडतें घेण्याच्या यत्नांत त्यांना संपूर्ण अपयश आलें. त्यामुळें सारा घोंटाळा निर्माण झाला. १९२३ मध्यें जर्मनींत एका पावाची किंमत ४०० मार्कस् व वर्तमानपत्राची २०० मार्क्स होत्या. साध्या ट्रॅमच्या तिकीटास नोटांची पुडकी देणेचा प्रसंग लोकावर आला. कागदी चलन अमर्याद फुगविल्यानंतर त्याची हटकून होणारी प्रतिक्रिया, देशाला व लोकांना विघातक होते हा अनुभव गेल्या युद्धांत सर्वांना आलेला आहे. त्याची प्रचीति पुनः कोण पाहील ?

इंग्लंडचा युद्धखर्च

चालू युद्ध हें जसें राष्ट्रीय आहे तसेंच ते लोकयुद्धहि पण आहे. तें देशांतील सर्व नागरिकांनीं आत्मीयतेने व सहकार्यानें चालविणे भाग असल्यानें त्याचा खर्चहि पण त्यानींच सोसला पाहिजे. या न्यायानें आज इंग्लंडमधील प्रचंड युद्धखर्च राष्ट्रीय कर व कर्ज याच्या जोरावर चालविला गेला आहे. हिंदुस्थानच्या कितीतरी अधिक पटीनें तेथील खर्च, पण तेथील बाजारभाव कडाडूं नयेत व चोरबाजारांचा सुळसुळाट होऊं नये, म्हणून चलन वाजवीपेक्षा जास्त न वाढविण्याची दक्षता त्यांनीं परिपूर्ण घेतलेली आहे. याबाबत परवाच टाईम्समध्यें नित्य येणाऱ्या लंडन बातमीपत्रांतील उतारा पहा " राष्ट्रीय युद्धखर्चाचे आंकडे म्हणजे चंद्रसूर्य, ग्रह, पृथ्वी यांचे दरम्यान अंतराचे खगोलशास्त्रांतील प्रचंड आंकड्याप्रमाणें बनले आहेत, कीं त्याची व्यावहारिक कल्पना सर्वसाधारण माणसास येणेंच शक्य नाहीं. लोकांवरील कराची व्याप्ती व बोजा इतका अवाढव्य झाला आहे, कीं त्यांत आता वाढ होणेंच शक्य नाहीं. " (National expenditure has reached such austronomical figures, that it has ceased to possess any real meaning. Taxation has attained such heights or depths that it is almost impossible to anticipate anything heavier.) सर्वसाधारण उत्पन्नावरील कराची किमान आकारणी पौंडांमागें 'दहा शिलिंग' प्रमाणें असून, ती जास्तीतजास्त पुढील उत्पन्नास १८ शिलिंगापर्यंत वाढविण्यात आलेली आहे. नवीन बजेटांत युद्धखर्चापैकीं निम्मा खर्च करमार्गें वसूल केला जाणार आहे. यंदाच्या नवीन वर्षाच्या बजेटांत प्राप्तीवरील कराची व्याप्ती अधिक विस्तृत करणेंत येऊन, त्याच्या कक्षेंत नवीन ७० लाख लोकांना ओढून, त्यांच्या खिश्यांना कात्री लावण्यांत आली. उत्पन्नावरील कर इतका वाढविला गेला आहे कीं, कोणा-

चेहि हातीं वार्षिक ६००० पेक्षां जास्ती पौंड मुळीं राहूंच नयेत. तंबाखू, दारू व इतर चैनीच्या वस्तूवर शेंकडा १०० टक्के कर बसविणेंत आला आहे. विलायतेतील लोकांना विशेषत: पोरींना सिगारेटसचें भारीच व्यसन आहे. दहा सिगारेटस्च्या पाकिटाची आज किंमत १ शिं. २ पेन्स करणेंत आली असली, तरी ओढणाऱ्याची तल्लफ सरकारी कराच्या जोरावर नाहींशी करिता येत नाहीं असा तिथें अनुभव येत आहे. इकडे हिंदुस्थानांत यंदा तंबाखूवर कर वाढवितांच काय आरडा चालला आहे, तो आपण पहातोच आहोंत. या साऱ्या गोष्टीमुळें तेथील राहणीच्या खर्चाचें मान वाढले नाहीं, मजुरीचे दर वाढले नाहींत व चलनहि फुगले नाहीं. जें कराच्या बाबतींत तेंच कर्जाच्या बाबतींत. लोकांचे पैसे सरकारी कर्जरोख्यांत खुषीच्या सक्तीनें अगर सक्तीच्या खुषीनें गुंतविणेस प्रोत्साहन दिलें जात आहे. कंपन्यांच्या फायद्यावर सरकारनें काकदृष्टि केव्हांपासून ठेवली असून, डेव्हिडंडस्वरहि सक्त नियंत्रण आहे

याखेरीज ब्रिटननें युद्धखर्च निभावावा म्हणून परराष्ट्रांतील आपली मालमत्ता, भांडवल आदि गोष्टी फुकून टाकण्यासहि (Liquidation) सुरवात केली आहे. बाहेरच्या साम्राज्यांतील प्रचंड मालमत्ता व भांडवल बुडाल्यामुळें व हिंदुस्थान आतां धनको बनल्यानें, ब्रिटनच्या-पतीवर व तिजोरीवर युद्ध संपल्यावर फार मोठा ताण बसणार म्हणून आज ब्रिटनमधील लोकांना भीति वाटूं लागली आहे. भावनियंत्रण व शिधापद्धत (रेशनिंग) या गोष्टी तर आज ब्रिटननें उत्कृष्टपणें यशस्वी करून दाखविल्या आहेत. अमेरिकेकडून मिळणाऱ्या प्रचंड युद्धसा-हित्यापायीं भरमसाट कागदी पौंडाचें चलन फुगूं नये, म्हणून उधार उसनवार बिलाचा ते पुरेपूर फायदा घेत आहेत. इतक्याहि उपर जे थोडे-बहुत कागदी चलन फुगेल तें युद्धानंतर योग्य मार्गांनीं आंखडते घेतलें

जावें म्हणून, बेकारी, रुगणाई, वार्धक्य इ. अवस्थेंतील प्रत्येकाच्या चरितार्थाची सोय लागणेस्तव सामाजिक स्थैर्याबाबतची विस्तृत योजना (Social Security) सध्यां आंखली जात आहे. (Beveridge Plan) सध्याचें युद्ध खरेखुरें लोकयुद्ध आहे याची पुरी जाणीव तेथील लोकांना असल्यामुळें, या साऱ्या योजना सिद्धीस जात आहेत.

अमेरिकेचा युद्धखर्च

अमेरिकेंतहि हें राष्ट्रीययुद्ध कर व कर्ज या दोहोंवरच चालविले जात असून, देशांतील चलन प्रमाणाबाहेर फुगूं नये व बाजारभाव कडाडू नयेत, म्हणून अवश्य ती खबरदारी घेतली जात आहे. चालू युद्धापूर्वी युद्धमान देशास शस्त्रास्त्रें पुरविण्यास तटस्थता कायद्यानें अमेरिकेंत बंदी होती, ती १९३९ च्या नोव्हेंबरमध्यें अध्यक्षानी अंशत: दूर केली. रोख रक्कम घेऊन माल देणेस (Cash And Carry) हरकत नाहीं, अशी सोय अध्यक्षांनीं करून, देशांतील भांडवलवाल्यांची चंगळ केली. याचा फायदा इंग्लंडनें पुरेपूर घेतला. अमेरिकेंत प्रचंड प्रमाणावर युद्धसामुग्रीची खरेदी ब्रिटननें केली खरी, पण त्यापायीं ब्रिटनला अमेरिकेंतील आपले सर्व भांडवल फुंकून टाकावें लागले. आणि परतफेड करण्याजोगता ब्रिटनजवळ पैसा न राहिल्या कारणानें, पण युद्धसामुग्रीचा ओघ अखंड ब्रिटनकडे कायम राहावा म्हणून, १९४१ च्या मार्चमध्यें ‘ उधार उसनवार ’ कायद्याची तरतूद करण्यांत आली. पण त्या कायद्याची भाषा अशी मोघम वापरण्यांत आली कीं, त्याची व्याप्ती अमेरिकेच्या अध्यक्षानें आपल्या मर्जीनुसार वाटेल तितकी वाढवावी. “ ज्या देशांचें संरक्षण अमेरिकेच्या संरक्षणाच्या दृष्टीनें अवश्यक व उपयुक्त वाटेल, अशा देशांना युद्धोपयोगी माल विकणें, मोबदल्यानें देणें, खंडानें लागण करणें, उधार देणें अगर अन्य रीतीनें पुरविणें”

अशी शब्दरचना कायद्यांत आहे. या कायद्याच्या कक्षेंत आजच्या घटकेस इंग्लंड, ब्रिटिश साम्राज्यांतील सर्व देश व याशिवाय आणखी ३५ देशांचा समावेश होतो. या कायद्यानुसार आज अमेरिकेंतून निर्गत होणारा माल ग्रेटब्रिटन, रशिया व मध्यपूर्व; आस्ट्रेलिया अशा तीन युद्धक्षेत्राकडे सारख्या तिसऱ्या हिश्श्यानें रवाना होत आहे. हा कायदा अस्तित्वांत आल्यापासून ३१ मार्च १९४३ पर्यंत, अकरा हजार दशलक्ष डॉलर्स किंमतीचा माल युद्धमान देशांना उपलब्ध झाला आहे, आणि पुढील वर्षी या योजनेस साडे आठ हजार दशलक्ष डॉलर्सची जरुरी लागणार असें प्रसिद्ध झालें आहे. अमेरिकेचें युद्धसहाय्य आज दोस्तांना किती प्रचंड होत आहे, तें यावरून दिसून येणारें आहे.

१९४२ च्या ऑक्टोबरमध्यें चलन विस्तारावरील नियंत्रणाचा कायदा (Anti-Inflation Bill) पास करणेंत येऊन, तेथील अध्यक्षास चलनवाढ, वेठबिगार, पगार, तास, वेतन, भावनियंत्रण वगैरे सर्व गोष्टी राष्ट्रीय हिताच्या दृष्टीनें ठरविण्याचे संपूर्ण अधिकार सुपूर्त करण्यांत आले आहेत. यामुळें देशांतील महर्गतेच्या वाढत्या श्रेणीस आळा बसला आहे, व देशांतील चलनहि प्रमाणाबाहेर फुगूं शकत नाहीं. या अधिकारांच्या जोरावर कोळश्याच्या खाणींतील मजूर संपावर जातांच, त्या सर्व खाणी लष्कराकरवीं ताब्यांत घेण्याचा निर्वाणीचा हुकूम प्रे. रूझवेल्टांनीं आपले सेक्रेटरी मि. इकेज यांना ता. १ मे १९४३ रोजीं दिल्याचें आपण पाहिलें. रबराच्या कारखान्यांतील मजुरांनाहि संपावर न जाण्याबाबत अध्यक्षानीं नुकतीच तंबी दिल्याचें वाचलें. संपावर जाऊन कारखाने, खाणी बंद पाडणें हें अमेरिकेच्या युद्धकार्यांत खीळ घालण्यासारखें असून, सर्व जगाच्या पाठीवर लोकशाहीकरितां लढणाऱ्या आपल्या सैनिक-बांधवांचा द्रोह करण्यासारखें आहे, असे प्रे. रूझवेल्टनीं मजुरांना बजावलें आहे.

हिंदुस्थानचा युद्धखर्च

हिंदुस्थानचे आजपर्यंतचे लष्करी खर्चासुद्धां एकंदर बजेट १२० कोटींचे असे. त्यापैकीं निम्मा खर्च संरक्षणखात्यावर होई. चालू साली नवीन बजेटांत निव्वळ लष्करी खर्चाचा आंकडा २०० कोटींचा धरण्यांत आला आहे. तो २५० कोटीपर्यंत म्हणजे नेहमींच्या बजेटाच्या दुप्पट सहज होईल. वाढत्या बजेटाची तोंडमिळवणी करण्यासाठीं प्राप्तीवरील कराचे दर (Income Tax and Super Tax) सपाटून वाढविण्यांत आले आहेत. पण मोठमोठ्या कारखान्यांना अवास्तव मिळणाऱ्या नफ्यावर कसलाच निर्बंध नसल्यानें, डेव्हिडंडस् भरपूर मिळूं लागले आहेत. आणि अकारण मिळणारा फायदा सरकारी खजिन्यांत न भरता, कामकरी वर्गास बोनस, महागाईभत्ता इत्यादि स्वरूपांत वांटून फुकटचा मोठेपणा, आज बडेबडे शेठ, कारखानदार मिळवित आहेत. यामुळें जी देशांत प्रचंड ओरड झाली व त्यावर सरकारनें जी नवीन योजना जाहीर केली, त्यामुळें आज व्यवहारांत फाजील चलन खेळतें आहे ही गोष्ट अप्रत्यक्षरीत्या सरकारला कबूल करावी मात्र लागली.

चढत्या बाजारभावांस पायबंद घालण्यास्तव व सांप्रत व्यवहारांतील फाजील चलन परत खेचण्यासाठीं सरकारनें एक नवीन वटहुकूम नुकताच जारी केला आहे. या नवीन हुकूमामुळें, युद्धजन्य परिस्थितीमुळें होणाऱ्या जादा नफ्यापैकीं ९३$\frac{१}{३}$ टक्के हिस्सा सरकारी तिजोरींत जाणार असून, अवघा ६$\frac{२}{३}$ टक्के फायदा कारखानदारांच्या हातीं शिल्लक राहणार आहे. त्याचा तपशील असा:— मामुली नफा सोडून होणाऱ्या जादा नफ्यावर सरकारनें ६६$\frac{२}{३}$ टक्के कर पूर्वीच बसविला आहे, व इन्कमटॅक्स व सुपरटॅक्स मिळून नफ्यापैकीं १३$\frac{१}{२}$ टक्के सरकार उचलित असे. यामुळें कर

भरणाऱ्या कारखानदारांच्या हातीं २० टक्के भाग राही. या वीस टक्क्यापैकीं सरकारनें ठेव म्हणून आणखी १३ई टक्के भाग सरकारी कर्जरोख्यांत गुंतविण्याची जी कारखानदारांच्या मर्जीवर गोष्ट इतके दिवस सोंपविली होती, ती आता सरकारने सक्तीनें घेणेचे ठरविले आहे. त्यावर ठेवीदाराला दोन टक्के व्याज देण्यांत येणार आहे. ही सक्तीची ठेव व्याजासह युद्धसमाप्तीनंतर एक वर्षांत अगर ठेव ठेवल्यापासून दोन वर्षांनंतर — यापैकी जी मुदत अधिक ठरेल त्या मुदतीनंतर—सरकार परत करणार आहे. ही योजना यशस्वी व्हावी म्हणून, कर भरणाऱ्या व्यापारी — कारखानदारांचे हिशोब पुरे होतांच, जादा नफ्याची तपासणी करणारे सरकारी अधिकारी त्यांना भेटून, वाटाघाट करून, जादा नफ्याची रक्कम मुक्रर करून; त्यावरील कराची आकारणी व वसुली करतील, अशी योजना मुद्दाम करण्यांत आली आहे. शिवाय कमिशन, बोनस, कच्च्या मालाच्या शिलकीची मोजदाद वगैरे गोष्टी सरकारला कळण्याची व्यवस्था त्यामध्यें मुद्दाम करण्यांत आली आहे. यामुळें कारखानदार भरमसाटपणें मालाचे सांठे करून, बाजारांत तुटवडा उत्पन्न करून महगता वाढवितात, या गोष्टीस आळा बसेल असें सरकारला वाटते. हिंदी संस्थानासहि हे नवीन कायदे लागू करण्याबाबत सरकार विचार करीत आहे.

तसेंच हिंदुस्थान सरकारनें भारतसंरक्षण कायद्याच्या ९४ व्या कलमान्वयें मध्यवर्ती सरकारच्या पूर्व संमतिशिवाय, नव्यानें भांडवल उभारून कंपन्या काढण्यास किंवा विद्यमान लिमिटेड कंपन्याना नवीन शेअर विक्रीस काढण्यास बंदी केली आहे. नव्या भांडवल उभारणीच्या वेळेस रिझर्व बँकेचा सल्ला घेऊन सरकार परवानगी देणार आहे. भरभक्कम पायावर उभारल्या जाणाऱ्या कंपन्याना यांची आडकाठी येणार नाहीं, पण महायुद्धाच्या उत्तरार्धांत जादा नफा, बाजारभावांची चढती

कमान, लोकांच्या जवळील विपुल पैसा, यामुळें उपटसुंभ कंपन्या निघूं नयेत म्हणून ही तरतूद करण्यांत आली आहे. कारखान्यांना युद्धोत्तर कालांतहि जागतिक स्पर्धेशी टक्कर देता येईल, अशाच उद्योगधंद्याना संरक्षण देण्याचा हेतू यामध्यें सरकारचा आहे. हिंदी व्यापार उदीमाच्या भवितव्याच्या दृष्टीनें ही सरकारची दक्षता योग्य आहे असेंच कोणीहि म्हणेल.

या वटहुकूमामुळें, डेव्हिडंसवरहि अप्रत्यक्ष नियंत्रण बसेल, बोनस, महागाईभत्ता इ. स्वरूपानें लोकांच्या हातीं जाण्याऱ्या फाजील पैशाला पायबंद बसेल आणि व्यापारी लोक आपला विपुल नफ्याचा पैसा वस्तूंच्या प्रचंड सांठ्यात गुंतवून महर्गता वाढविण्यास कारणीभूत होतात, तोहि प्रकार बंद पडेल असें सरकारला वाटते. या योजनेनुसार सुमारें १०० कोटी रुपये व्यापारी कारखानदारांच्या हातून ताबडतोब सरकारी तिजोरीत जमा होतील असा सरकारी अंदाज आहे. पण हा बाजारभाव नियंत्रणाचा प्रभावी हमखास उपाय नव्हे, असें कष्टानें म्हणणें भाग आहे. कारण जोंवर फडणिशी खात्याचा दर दिवसास एक कोटी नवीन चलनाची भर घालण्याचा उपक्रम चालू आहे, तोंवर या तुटपुंज्या योजनेनें सरकारचा बाजारभाव नियंत्रणाचा उद्देश सफल होईल असें वाटत नाहीं. तथापि इतके दिवस सरकार कांहींच हालचाल करीत नव्हते, आता कोठें जागें झाले आहे, ही एक समाधानाची गोष्ट नव्हे का ?

प्रा. वकीलांच्या उपयुक्त सूचना

हिंदुस्थानांतील युद्धखर्च इंग्लंड अमेरिकेप्रमाणें कर व कर्ज यावर चालविला जावा व केवळ कागदी नोटा काढून त्याची तोंडमिळवणी केली जाऊं नये अशी हिंदी लोकांची अपेक्षा असणें स्वाभाविक आहे. हाच दृष्टि-

कोण प्रा. वकील यांनीं ठळकपणें लोकांचे पुढें मांडला असून, युद्धखर्चाची तोंडमिळवणी होण्यास्तव आज जो चलन फुगविण्याचा अनुचित मार्ग सरकारनें स्वीकारला आहे, त्याऐवजी त्यांनीं ४।५ उपयुक्त सूचना केल्या आहेत, त्या सर्व विचारार्ह वाटल्याविना राहणार नाहींत. त्या येणेंप्रमाणें:—

(१) हिंदुस्थानच्या संरक्षणाचा जेवढा वाजवी खर्च आहे, तेवढाच आमचे शिरावर बसावा व बाकीचा ब्रिटिश सरकारनें सोसावा. आज आमच्या लष्करी खर्चांतील कांहीं भाग ब्रिटन उचलतें हें खरें, पण त्याचा मोबदला ते दामदुपटीनें वसूल करितें. हिंदी सैन्य साम्राज्य सैन्याचा भाग असल्यानें, आज त्याचा मनसुराद उपयोग आफ्रिकन रणांगणावर केला जात आहे. हिंदुस्थान् हें पूर्वेकडील आघाडीसाठी जणूं सध्यां दारुगोळ्यांचे अजस्र कोठारच बनले आहे (Arsenal of war). तसेंच ब्रम्हदेश आमच्या देशापासून तोडून निराळा केला आहे. तिकडून शत्रू येऊं नये म्हणून जपानचा बंदोबस्त होण्यापुरता खर्च आमचेवर बसावा, पण ब्रम्हदेश जिंकण्याच्या मोहिमेचा खर्च आमच्या शिरावर लादणें योग्य होणार नाहीं. उधारउसनवार बिलाप्रमाणें आज कोट्यावधि रुपयांचे युद्धसाहित्य आम्हास मिळत आहे, पण ते किती मिळत आहे व त्याची भरपाई कशी व कोणत्या रितीनें केली जाणार याबाबत सरकारनें केलेली योजना गुलदस्तांतच आहे.

(२) अमेरिकन सैन्याच्या येथील वास्तव्यासाठीं व सुखसोईस्तव आज हिंदुस्थान पाण्यासारखा पैसा खर्च करीत आहे. पण त्याच्या बदली आम्हास डॉलर्स मिळत नाहींत, तर कागदी पौंड. याचें कारण आमचा गुमास्ता ब्रिटन. यामुळेंच आज कागदी पौंडाचा संचय प्रतिदिनी लक्षावधीनीं वाढत चालला आहे. वस्तुतः आमच्या मालाच्या मोबदला डॉलर्स मिळणें वाजवी नाहीं का? तसेंच पाहिलें तर सुवर्णाचा पाठिंबा डॉलर्सना भरपूर

असल्यानें, कागदी पौंडापेक्षा डॉलर्सबद्दल येथील लोकांना प्रेम वाटणें स्वाभाविक नाहीं का? आज अमेरिकेने साऱ्या जगांतील सोने ओढून आपल्याजवळ संचय केला आहे. जगांतील $\frac{1}{3}$ सुवर्ण आज ते राष्ट्र बाळगून असल्यानें, अक्षरशः त्या राष्ट्रांत सोन्याचा धूर निघत आहे. सुवर्णाचें वेड असलेल्या हिंदी लोकांना सोन्याचे डॉलर्स लाभतील तर अधिक उत्साह वाटणार नाहीं का?

(३) आजच्या परिस्थितींत हिंदुस्थान हा धनको असून, ब्रिटन ऋणको आहे. वास्तविक धनकोनें ऋणकोवर अटी लादण्याचा शिरस्ता आहे, पण त्याच्या उलट इथें प्रकार आहे. हिंदुस्थानचे देणें विलायतेमध्यें कागदी पौंडाच्या संचयांत वाढत चाललें आहे. त्याऐवजी ब्रिटननें हिंदुस्थानांत असलेली सुमारें तीनचारशें कोटींची मालमत्ता व भांडवल विकून टाकून, वरील देणें फेडून का टाकूं नये? ब्रिटननें चीन, अमेरिका, ऑफ्रिका येथील नाहीं का आपलें भांडवल फुंकून टाकले? तो मार्ग ब्रिटननें अनुसरला, तर ते भांडवल हिंदी व्यापारी मोठ्या हौसेने खरेदतील.

(४) तसेंच 'आज रोख उद्यां उधार' या व्यापारांतील मूलभूत सिद्धांताप्रमाणें, ब्रिटननें हिंदुस्थानचे देणें सोनें, चांदी निदान यंत्रसामुग्री या स्वरूपांत का देऊं नये? जहाजांची कमरता व पाणबुड्यांचा उपद्रव ही कारणें कदाचित यास उत्तर म्हणून सांगतील. पण युद्धाच्या ऐनरंगात येथील सोनें, चांदी, अन्न, कच्चा माल इ. नेण्यास या अडचणी ब्रिटनच्या कधींच आड आल्या नाहींत, त्या अडचणी आता पुढें करणें योग्य होणार नाहीं. ब्रिटननें निदान यंत्रसामुग्री पुरविल्यास, इथें अनेक नवीन उद्योगधंदे प्रस्थापित होण्यास मुळींच अडचण पडणार नाहीं.

(५) तसेंच ब्रिटननें हिंदुस्थानचे देणें भागविण्यासाठी इथें आपले भांडवल, मत्ता इ. च्या तारणावर रुपयांच्या नाण्यांत कर्ज उभारावें.

साम्राज्यवादी राज्यकर्त्यांने आपल्या मांडलिकत्वाखाली असलेल्या देशामध्यें कर्ज उभारणें ही गोष्ट इभ्रतीस कमी आणणारी वाटल्यानें, या सूचनेच्या अंमलबजावणीची शक्यता दिसत नाहीं. तसेंच ब्रिटिश येथील आपल्या भांडवलावर आपसुखानें पाणी सोडतील हीहि आशा व्यर्थ आहे. अर्थात प्रा. वकीलांच्या सूचना कितीहि विचारार्ह व स्वागतार्ह वाटल्या, तरी त्या ब्रिटन स्वीकारेल व सध्यांचे चलन फुगविणेच्या धोरणांत कांहीं फेरबदल होईल असा संभव तूर्त तरी दिसत नाहीं.

सरकारी धोरणाचा उदोउदो करणारे मि. नेमनई यानीं जरी प्रा. वकीलांना तात्त्विक अर्थशास्त्रज्ञ म्हणून कुचेष्टा केली, तथापि कागदी पौंड-धनाचा फार मोठा संचय विलायतेमध्यें असणें व त्याच्या तारणावर इकडे सहाहजार मैलांवर कागदी नोटा अवास्तव प्रसृत होणें इष्ट नाहीं, हें मान्यच करावें लागले; हे लक्ष्यांत ठेवण्यासारखें आहे.

एवंच, चलन फुगविणेसारख्या कृत्रिम उपायांनी बाजारभाव वाढविणें म्हणजे जनतेची कंगाल परिस्थिती करण्यासारखें आहे. चलनाच्या महापुरानंतर चलनाची टंचाई सुरूं झाली म्हणजे सध्याच्या चुकीच्या धोरणामुळें आपल्या देशाच्या आर्थिक रचनेस भयंकर हेलकावे व हादरे बसतील, अशी साधार भीति प्रा. वकीलांनी प्रगट केली आहे.

पैश्याचा सुकाळ नि अन्नाचा दुष्काळ

हिंदुस्थान स्वावलंबी आहे काय ?

पैश्याच्या सुकाळाच्या कालांत इथें अन्नाचा दुष्काळ भासण्यास फाजील कागदी चलन कसें कारणीभूत आहे, याचा उहापोह मागील प्रकरणांत केला. आता त्याशिवाय जीं इतर कारणें चालू परिस्थितीस जबाबदार आहेत, त्यांचा विचार करूं. त्यापूर्वी हिंदुस्थान अन्नादि पदार्थांच्या बाबतींत स्वावलंबी आहे काय ते पाहूं. हिंदुस्थान स्वावलंबी आहे असें सरकार प्रतिपादते. पण हिंदुस्थानच्या वाढलेल्या लोकसंख्येस पुरेल इतकें अन्न इथें पैदा होते, असें निर्विवादपणें म्हणण्यास, येथील कच्च्यापक्क्या मालाच्या उत्पादनाच्या गणतीच्या अभावी फार मोठी अडचण आहे.

गेल्या २५–३० वर्षांच्या इतिहासावरून या गोष्टीवर थोडासा प्रकाश पडूं शकेल. १९१० पासून १९३८ पर्यंत येथील गव्हाची पैदास थोडीशी वाढलेली असली, तथापि त्यामानानें तांदळाची पैदास मात्र वाढलेली दिसत नाहीं. पण ज्वारी; बाजरी या धान्यांच्या पैदाशींत मात्र बरीच वाढ झालेली आढळते. ज्वारी व बाजरी ही धान्यें कमी सत्त्वाची असल्यानें, ती गरीब लोकांचे अन्न म्हणून गणली जातात. गहूं व तांदूळ जास्त सत्त्वाची अन्नें असल्यानें, त्याची पैदास न वाढणे याचा अर्थ, येथील लोक गरीब बनत चालले आहेत, दिवसेंदिवस येथील जमिनींची प्रत हलकी होत चालली आहे आणि शेतकऱ्यांच्या वाढत्या हलाखीमुळें ही धान्यें पिकविणें परवडत नाहीं, असाच निष्कर्ष अनुमानानें काढणें युक्त ठरते. तसेंच इतर देशांशी तुलनात्मकदृष्टीनें पाहिल्यास इथें दर एकरी जी धान्यें पिक-

तात, तीहि योग्य व पुरेश्या लागवडीच्या अभावी, कितीतरी कमी प्रमाणांत असतात, हेंहि सर्वांना विदित आहे. विशेषतः कापूस, ताग व ऊंस सारख्या पैसा उत्पन्न करणाऱ्या पिकांच्या (Money crops) वाढत्या लागवडीमुळें, जमिनींचा सकसपणा दरवर्षी कमी होत आहे. अर्थात येथील दर शिरगणतीत कोटींनी भर पडणाऱ्या लोकसंख्येस पुरेसें अन्न निर्माण होत नसले पाहिजे. खाण्याची धान्यें अधिक पिकविण्याच्या दृष्टीनें हिंदुस्थान सरकारचे शेतकीखातें उदासीन राहिले, याचाच हा परिणाम आहे. प्रत्यक्ष लढाई ऐनरंगात येऊन दुष्काळाचीं पूर्व चिन्हें दृग्गोचर होऊं लागल्यावर, सरकार जागें झाले. इतकीं वर्षे नुसती शेतकीची प्रदर्शनें भरवून, शेतकीबद्दलची आस्था प्रगट केली, आता रेल्वे प्लॅटफॉर्म्सवर "पेरील कपाशी तर राहील उपाशी" अशी फलकें लावून जाहिरातबाजी पुष्कळ करण्यास सुरवात केली आहे. पण धान्यें पिकविणाऱ्यांना भरपूर सवलती, सुखसोई, शेतकीप्रधान मालास योग्य किंमती, वहातुकीच्या दरांत सवलती वगैरे सक्रीय सहानुभूतीपर गोष्टी सरकारनें खरोखरी करावयास हव्यात. शेतकी व शेतकरी यांच्या सुधारण्याच्या दृष्टीनें, आतापर्यंत पुष्कळ गोष्टी करिता आल्या असत्या. विशेषतः स्टार्च जास्त असलेल्या बटाटेसारखें कंदमूळाच्या लागवडीस उत्तेजन, गहूं, तांदूळ इ. सात्विक धान्याच्या लागवडीस प्रोत्साहन, सोयाबीनसारख्या नवीन धान्याच्या व फळफळावळांच्या लागवडीस चालना, शेतकऱ्यांच्या शेतकीधंद्याच्या जोडीस कोंबडीं, डुकरें, शेळया वगैरे पाळणें, इतर लहान हस्तव्यवसायांना उत्तेजन, पाण्यांतील मास्यांच्या उत्पत्तींत वाढ करणें अशा पुष्कळ गोष्टी सांगता येतील. भावी युद्धाच्या दृष्टीनें जर्मनींत गेले दहावर्षे सरकारनें अत्यंत कसोशीनें शेतकीकडे लक्ष्य पुरविले आहे, म्हणूनच इतकी तग तो मारूं शकतो, हें केव्हांहि विसरता कामा नये.

लष्करी गरजांना प्राधान्य

युद्धामुळें आधींच तुटवडा असलेल्या आमच्या देशांतील कच्च्या पक्क्या मालास बाहेरच्या देशाकडून निकडीची मागणी येणें स्वाभाविक आहे. याशिवाय हिंदुस्थानच्या व पर्यायानें साम्राज्याच्या रक्षणार्थ इथें कितीतरी लाख ब्रिटिश व अमेरिकन सैन्य गोळा झाले आहे, त्यांच्या चरितार्थासाठीं येथील सरकार भरपूर धान्यादि पदार्थ खरेदीत आहे. खुद्द हिंदी लष्करहि कितीतरी पटीनें वाढलें आहे. त्यांतच पोलंड, ब्रह्मदेश आदि देशांतील लाखो निराश्रित व पूर्वेकडील लढ्यांतील हजारों इटॅलिअन, जर्मन, व जपानी युद्धकैद्यांच्या पोटापाण्याची सोय आज येथील सरकारला करावी लागत आहे. साधारणपणें अशा सैनिकासाठीं सर्व साधारण नागरिकांच्या दिडीदुपटीनें अन्न लागते. फ्रेंच भाषेंत अशी एक म्हण आहे कीं सैन्यें पायानें चालत नसून, सर्पाप्रमाणें पोटावर चालतात. या न्यायानें लष्कराच्या निर्वाहास लागणारें भरपूर अन्न व धान्यें येथील सरकार खरेदून सांठा करणें स्वाभाविक आहे. पण त्याचबरोबर येथील एकंदर अन्न पुरवठा किती व नागरिकांच्या निर्वाहाची सोय कशी लावावयाची याचाहि विचार यापूर्वी सरकारनें करावयास पाहिजे आहे. हें खरें लोकयुद्ध असल्यानें रणांगणावरील आघाडीप्रमाणेंच, नागरिकांच्या चरितार्थाची योग्य तरतूद करून " **घरची आघाडी** " (Home Front) संभाळणें हेंहि एक सरकारचें कर्तव्य आहे. खुद्द ब्रिटनमध्यें लोकांना योग्य किंमतींत भरपूर भाकरी पुरविणें, ही ब्रिटिश पुरवठा खात्यांतील यशाची गुरुकिल्ली मानली जाते. युद्धमान राष्ट्रांत अन्नाच्या अभावी लोकक्षोभ होऊं न देण्याकडे प्रत्येक सरकार डोळयांत तेल घालून जपत आहे.

घटोत्कची मायाबाजार

यांत आणखी कांहीं गोष्टींनीं भर घातली आहे. पैश्याची किंमत घसरल्यामुळें व लढाईच्या भीतिग्रस्त वातावरणामुळें, येथील शेतकऱ्यापासून ते तहत श्रीमंतापर्यंत धान्यादि पदार्थांचा आपल्या गरजेपेक्षां जास्त सांठा करण्याची दुष्ट प्रवृत्ति निर्माण झालेली दिसेल. व्यापाऱ्यांच्या कृष्णकृत्यांना तर मोठी नामी संधि प्राप्त झाली आहे. अवास्तव नफ्याच्या लालसेनें प्रवृत्त होऊन, ते मोठाले सौदे करून, बाजारपेठांत बरीच घालमेल करीत आहेत. शिवाय त्यांनीं मोठमोठाले सांठे करून ठेविले असून, घटोत्कची मायाबाजारच जणूं उघडले आहेत. अशा चोरबाजारांतून सर्व चिजा विकून गोरगरीब नागरिकांना नागविण्याचे त्यांचे प्रयत्न पद्धतशीर चालू आहेत. उदाहरणार्थ, परवाच मुंबईतील कापसाचे सौदे करणाऱ्या सट्टेबाजांना हिंदुस्थान सरकारच्या फडणीसांनीं दिलेली तंबी सर्वांच्या स्मरणांत असेलच. येथील आंखूड धाग्याच्या कापसाचे खरें गिऱ्हाईक जपान, ते नाहींसे झाल्यानें, त्याचा भाव एकदम कडाडण्यास नको होता. आणि वस्तुतः त्यास खरी मागणी नव्हती. पण सट्टेबाजांनी बाजारांत धांदल उडवून दिली. पण या वाढलेल्या भावाचा फायदा शेतकऱ्यांस तरी मिळाला काय ? मुळींच नाहीं. या कापसास खरी मागणी नाहीं, हा खोटा भाव आहे सबब पेरूं नका; म्हणून सरकारनें कितीहि आर्जवून सांगितले, तरी जोंवर ही सट्टेबाजांची घालमेल चालू आहे, तोंवर शेतकऱ्यांचा त्यावर विश्वास कसा बसणार ? या दृष्टीनें सरकारनें कपाशीच्या बाजारांतील मुदतीचे सौदे (Forward Cotton Trades) बंद केल्याचा वटहुकूम नुकताच काढला आहे, त्याचा परिणाम काय होतो पहावें. युद्धकालीन भयग्रस्त वातावरणाचा अयोग्य फायदा घेण्यास सोकावलेल्या व्यापाऱ्यांनीं येथील

परिस्थिती नासून टाकली आहे. सोन्याचांदीच्या भावांत गेल्या वर्षांपासून विशेषतः गेल्या महिन्यांत जी विलक्षण कल्पनातीत वाढ झाली आहे, त्याचें कारणहि येथील लोक आपल्या कागदी नोटा या धातूंमध्यें गुंतवूं लागले आहेत, हें होय.

वहातुकीचा प्रश्न

हिंदुस्थानांत निरनिराळें प्रांत धान्यादि पदार्थांचे बाबतींत परस्परां-वर अवलंबून असल्यानें, सध्यांच्या दुष्काळास वहातुकीचा प्रश्न अंशतः जबाबदार आहे. आमचा देश अफाट, त्या मानानें इतर देशाशीं तुलना करून पाहिल्यास, येथील वहातुकीची साधनें अपुरी आहेत, हें कोणासहि मान्य करावें लागेल. पण हा देश मुख्यतः कृषिप्रधान व गरीब लोकांचा असल्यानें, आणि औद्योगिक सुधारणा व मोठमोठाले कारखाने पाश्चात्य देशाप्रमाणें विपुल नसल्यानें, वहातुकीच्या साधनांची कमतरता इतके दिवस फारशी भासली नाहीं. वर्षांतून पीकें निघण्याच्या हंगामांतच काय तो ताण या साधनांवर पडे; एरव्हींची वहातूक निर्वेध चाले. त्यांत इंजिनें जहाजें, मोटारी इ. साधनें इथें तयार होत नसल्यानें, ऐन युद्धाच्या धाम-धुमीत ती परदेशाहून आणविणें अशक्य झाल्यानें, वहातुकीची अडचण इतकी भासूं लागली आहे. पाश्चात्याप्रमाणें हवेंतील वहातूक विमानांच्या अभावी इथें सुरूं झाली नसल्यानें, त्याचा विचार करण्याचे कारण नाहीं.

मोटार वहातूक

गेल्या दोन वर्षांत मोटार वहातुकींत पेट्रोल रेशनिंगमुळें कितीतरी अडथळे उत्पन्न झाले आहेत. मोटारींना लागणारे पेट्रोल मुख्यतः ब्रह्म-

दशाकडून येई, तो देश जपानांकित झाल्यापासून, व युद्ध प्रत्यक्ष हिंदुस्थानच्या उंबरठ्यावरच येऊन ठेपल्यामुळें, सरकारला असलेला सांठा लष्करी कारणाकरितां राखून ठेवणें आवश्यक झालें; सार्वजनिक मोटार वहातुकींत पेट्रोल रेशनिंग होणें अपरिहार्य झालें. तरी पण इराक देशावरील ब्रिटिशांच्या स्वामित्त्वामुळें व ब्रह्मदेशांतील प्रचंड पेट्रोल सांठे सरकारनें इथें आणविल्यामुळें, लष्कराची गरज तरी का होईना भागूं शकली. मोटारींचे सुटे भाग मुख्यतः अमेरिकेहून येत असत; अमेरिकेंतील मोटारींच्या कारखान्यांचें रूपांतर शस्त्रास्त्रांच्या कारखान्यांत झाल्याने, ते सुटे विभाग आता येऊं शकत नाहींत. पेट्रोलच्या अभावीं कोळश्याच्या गॅसची कल्पना निघाली व आज इथें सुमारें ७५ कारखान्यांतून गॅसप्लँटस् निघतात; म्हणून कसाबसा निभाव लागला. गॅसप्लँटस्च्या उत्पादनांत मुंबई, मद्रास, पंजाब व संयुक्त प्रांत यांनीं अग्रेसरत्व पटकावलेलें आहे. हिंदुस्थानांत आतापर्यंत सुमारें साडेसहा हजार बसेस व दोन हजार लॉऱ्यांना गॅसप्लँटस् बसविण्यांत आलीं आहेत. गॅसप्लँटस् बसविलेल्या खासगी गाड्यांची संख्याहि साडेदहा हजारापर्यंत भरेल. गॅसप्लँटस्च्या वापरामुळें आज सुमारे दीडकोट गॅलन पेट्रोलची वार्षिक बचत खास होत आहे. पण आता मोटारीपुढें; ब्रिटिशांचे मोठाले रबराचे मळे नष्ट झाल्यामुळें, रबरटायर्सचा गंभीर प्रश्न दत्त म्हणून उभा राहिला आहे. मोटारटायर्सवर सरकारनें नियंत्रण बसविलें तें याच कारणामुळें. पाश्चात्य देशाप्रमाणें रबरच्या बदली पदार्थाची (Synthetic Rubbar) कल्पना वेळेवर न निघाल्यास, येथील मोटारींचे सांगाडे चुलींत घालण्याशिवाय गत्यंतर राहणार नाहीं. देशांतील कानाकोपरापर्यंत सर्व प्रकारचा माल पोचविणारे हें मोटारीचें साधन बंद पडण्यानें, फार मोठी गंभीर अडचण देशांतील पुरवठ्याबाबत निर्माण होणार आहे.

पाण्यावरील वहातूक

पाण्यावरील वहातुकींतहि अशाच अडचणी निर्माण झाल्या आहेत. हिंदुस्थानचा एवढा अफाट किनारा असता, त्या मानानें निदान किनाऱ्यालगतच्या पाण्यांतील साधनें अमूप असावयास हवी होतीं. पण जहाजें, बोटी बांधण्याकडे सरकारनें युद्धारंभापर्यंत पूर्णपणें दुर्लक्ष्य केले. युद्ध सुरू होतांच किनाऱ्यालगतच्या होत्या नव्हत्या त्या मालाच्या बोटी सरकारनें ताब्यांत घेऊन, कांहीं लष्करी वहातुकीस, तर कांहींवर तोफा चढवून देशाच्या रक्षणासाठी उपयोगार्थ आणल्या. त्यांत जपानचें आक्रमण अंदमान बेटापर्यंत झाल्यानें, बंगालच्या उपसागराकडील पूर्वेकडील निम्मा किनारा या वहातुकीस अत्यंत धोक्याचा अतएव निरुपयोगी झाला आहे. यामुळेंच रेल्वे–मोटारींच्या वहातुकीवर फार मोठा ताण बसूं लागला. त्यांत येथील बोटी सरकारनें इराण, इराक व पूर्वेकडील आघाडीकडे लष्करी कारणाला लावल्यानें, या साधनांस आज आम्हांस संपूर्णपणें मुकावें लागले आहे. खरें म्हटलें तर मुबलक वहातूक स्वस्त किंमतींत करणारे साधन याशिवाय दुसरें कोणतेंच नाहीं. पण केवळ सरकारच्या दुर्लक्ष्यामुळें व उत्तेजनाच्या अभावी, त्याची वाढ व प्रगति होऊं शकली नाहीं व आजच्या कालांत त्याची कमतरता तीव्रतेनें जाणवूं लागली आहे. आतां कोठें सरकार जागें झालें असून, जहाजें बांधण्याच्या व दुरुस्तीच्या गोद्या उभारून, घाईघाईनें नवीन मालबोटी व युद्ध नौका बांधू लागले आहे व नाविक शिक्षणांत हजारों हिंदी लोकांची भरती करूं लागले आहे.

रेल्वे वहातूक

देशातल्या देशांत पुष्कळ वहातुकीचे रेल्वे हे साधन होय. एरव्ही शांततेच्या कालांत " काश्मीरला चला, उटकमंड; म्हैसूर पहा " म्हणून

स्वस्त दरांत परतीचीं झोन तिकीटें काढून; जाहिरातबाजीनें लोकांना प्रवासाची चटक लावणाऱ्या रेल्वेवर, युद्धकालांत वहातुकीचा ताण असह्य झाल्यानें; लोकांना ' जरुरीशिवाय प्रवास करूं नका ' म्हणून हात जोडण्याची पाळी आली. रेल्वेनीं सर्व सवलती केव्हांच रद्द केल्या, लगेज, पार्सलचे भाव वाढविले, उतारूंच्या गाड्यामध्यें चौथा हिस्सा काट दिला, पण १९४१–४२ मध्यें मालवहातुकींत शेंकडा ३० टक्के व उतारूंच्या वहातुकींत शेंकडा १६ टक्के वाढच झाली. रेल्वेच्या कार्यक्षमतेंत निर्माण झालेल्या उणीवेस बऱ्याच गोष्टी कारणीभूत आहेत.

रेल्वेवर लष्करी वहातुकीचा भयंकर ताण पडूं लागला हें एक जबरदस्त कारण आहे. रेल्वेना लागणारे सुटे विभाग व इंजिनें आता पूर्वीप्रमाणें परदेशाहून मिळूं शकत नाहींत. येथील रेल्वे कारखान्यांतील हजारों कसबी कारागीरांची रवानगी शस्त्रास्त्रांच्या कारखान्यांत झाल्यानें, नवीन डबे तयार होईनात व नादुरुस्त डबे व इंजिनें वेळेवर दुरुस्त होईनात. या साऱ्या अडचणींतून रेल्वेनी काटकसरीनें व दूरदर्शित्वानें मार्ग काढावयास हवा होता, पण दुर्दैवानें त्यांची वागणूक उधळेपणाची, व उतारूंशी बेपर्वाईची निदान हेळसांडीची झाली. यांत येथील २०० मीटर गेजची इंजिनें, ८३०० मीटर गेजचे मालाचे डबे, १५०० स्टँडर्ड गेजचे मालडबे, छोट्या लाईनवरचे डबे इंजिने इ. एवढेंच नव्हे, तर ७७६ मैल लांबीची रेल्वे लाईन उखडून रूळसुद्धा इराणांतील नवीन रेल्वे बांधण्याकडे सरकारनें रवाना करून भर घातली आहे.

युद्धकालांत रेल्वेना असलेले मागील सर्व देणें फिटून गेले असून, त्यांच्या गंगाजळी व घसारा फंड तुडुंब भरले आहेत. गेल्या वर्षी रेल्वेचें उत्पन्न १४९ कोटी रुपयांचे झाले. गेल्या चार वर्षांत हे उत्पन्न अंदाजी चाळीस कोटींनी वाढलेलें आहे. त्यांत भावनियंत्रण व सांठ्याच्या धोरणामुळें

रेल्वेवरील कामाचा बोजा वाढला आहे. रेल्वेमध्यें सध्यां मिळणाऱ्या भरमसाट नफ्यांतून अमेरिकेहून आलेल्या ग्रॅडी शिष्टमंडळाच्या शिफारसीप्रमाणें, यंत्रें व इंजिनें तयार करणारे कारखाने काढण्याचे सरकारनें ठरविले असते तर देशाचा शाश्वत स्वरूपाचा फायदा तरी झाला असता. पण त्यामुळें विलायतेंतील भांडवलवाल्यांच्या हितावर पाणी पडत असल्यानें, त्या शिफारसीना तूर्त तरी सरकारनें वाटाण्याच्या अक्षता लावल्या आहेत.

हिंदुस्थानांतून प्रचंड निर्गत

याशिवाय चालू महर्गतेस दुसरें एक कारण या प्रकरणाच्या प्रारंभीं ध्वनित केल्याप्रमाणें, येथील कच्चापक्का माल लष्करी व इतर कारणाकरितां परदेशाकडे फारमोठ्या प्रमाणावर निर्यात होऊं लागला हें होय. याचा दाखला खासगी व्यापारांत, इथें आयात होणाऱ्या मालापेक्षा निर्गत मालाची किंमत किती जास्त झाली यांच्या आंकड्यावरून पटण्यासारखा आहे. १९३८–३९ सालीं खासगी व्यापारांतील आयातीपेक्षां निर्यातीचा वाढावा १६ लाख ८४ हजार होता, तो १९४१–४२ मध्यें ७९ लक्ष ६० हजार झाला. या वाढलेल्या निर्गतीमध्यें धान्य, साखर, चहा, अन्नाचें व कपड्यालत्त्यांचें प्रमाण बरेंच असल्याचें दिसून येते. १९३९–४० मध्यें धान्यादि अन्नाच्या आयातीपेक्षां निर्गतीचा वाढावा ६ लक्ष ७९ हजार होता, तो १९४१–४२मध्यें ३४ लक्ष ८० हजार झाला. तसेंच १९३९–४० मध्यें कपड्यालत्त्यांच्या बाबतींतहि आयातीपेक्षा निर्गतीचा वाढावा ५ लाख ७ हजार रुपये होता, तो १९ लक्ष २ हजार रुपयेपर्यंत वाढला.

वरील आंकडे हे केवळ खासगी व्यापारांतील घडामोडी दर्शविणारे आहेत. लष्करी कारणाकरितां सरकारनें या देशांत पुष्कळच कच्चापक्का माल खरेदून परदेशी धाडला आहे, त्यांचे आंकडे सरकारनें जाहीर केले नसल्यानें

कळण्यास मार्ग नाहीं, तथापि ती खरेदी प्रचंड असली पाहिजे हें उघड आहे. याचें एक लहानसें उदाहरण देतो. १९४१ अखेर ब्रिटननें स्वतः-करिता आमच्या देशांत कोणकोणता माल खरेदला तें पहा:—

१	इंजिनियरिंग लोखंडी व पोलादी सामान	९७·७ कोटी
२	कापसाचें कापड	५०·४ ,,
३	लोंकरीचें कापड	१७·६ ,,
४	इतर कापड	२८·८ ,,
५	अन्न सामुग्री	१६·२ ,,
६	कातड्याचें सामान	१०·२ ,,
७	लांकूड व लाकडाचें सामान	९·२ ,,
	एकूण	२३०·१ कोटी

वर उधृत केलेल्या चालत्या बोलत्या आंकड्यावरून आमच्या देशांत अन्नवस्त्रप्रावरण, कातडीं यांची दुर्मिळता कां झाली हें आतां सांगावयास हवे का ? या साऱ्या सरकारच्या धोरणाचा दृश्य परिणाम व कटु अनुभव आज आमच्या लोकांना भोगावें लागत आहेत. लष्करी कारणाकरिता सरकारनें गेल्यावर्षी प्रचंड प्रमाणावर आट्याची पोती (गव्हाचे पीठ) सांठवून ठेविलीं, आणि त्यांचे मातेरे होऊं लागतांच, आळ्या किडे यानी बिघडलेली आट्याची पोती आज पुणेकर रहिवाश्यांच्या वांट्यास आली. सरकारनें जुन्या पोत्यांची निरवानिरव अशा प्रकारें केली, त्याठिकाणी यंदाहि त्याचप्रमाणें प्रचंड सांठा लष्करी कारणास्तव केला असणारच. तीच अवस्था बाजरीची. सडलेली व कुजलेली बाजरी कडवट लागत असली तरी तिचा अन्न म्हणून उपयोग हिंदी माणसास आज करावा लागत आहेच ना ! लष्करी कारणाकरिता सरकार परदेशी प्रचंड प्रमाणावर धान्यादि

पदार्थांची निर्गत करीत आहे, त्याची नासाडी युद्धक्षेत्रावर व अन्य ठिकाणीं कशी होत असेल देव जाणे! पण खुद्द याच देशांत सरकारच्या अवाढव्य सांठ्याच्या धोरणाचा दृश्य परिणाम आळयांनीं किडलेला आटा व सडलेली बाजरी या स्वरूपांत दिसत आहे. आणि साहजिकच त्यामुळें हिंदी लोकांच्या प्रकृतीवर या निकृष्ट व कुजक्या अन्नाचा अत्यंत अनिष्ट परिणाम होत असून, त्या दिवसेंदिवस खालावत आहेत. शिवाय या कुजक्या अन्नामुळें कॉलरा वगैरेसारख्या सांथींचा प्रादुर्भाव होणें हि अपरिहार्य झालें आहे. याच्याच जोडीस कृषिप्रधान मालाच्या भावनियंत्रणाचे सरकारी धोरण धरसोडीचें व चुकीचें कसें झालें, याचा विचार शेवटच्या प्रकरणांत करूं.

अन्नवस्त्रप्रावरणाची टंचाई का ?

एखाद्या माणसास आपण चेष्टेनें म्हणतो कीं " हुंः त्यास काय कमी आहे, श्रीमंती ना गडगंच ! फक्त अन्नवस्त्र तेवढें कमी ! " बरोबर हीच स्थिति आज हिंदी माणसाची झालेली आहे. हिंदुस्थानांतले प्रांत स्वयंपूर्ण व स्वावलंबी नाहींत ही गोष्ट जगजाहीर आहे. त्यामध्यें वहातुकीच्या साधनांची कार्यक्षमता कमी झाल्यानें, जीवनास अत्यावश्यक असलेल्या गोष्टींची वाण आज प्रत्येकास भासत आहे.

तांदळाचा प्रश्न

हिंदुस्थान भातखाऊ देश म्हणून प्रसिद्ध आहे. सुमारें २४ कोटी लोकांचें तें मुख्य अन्न आहे. त्याच्या खालोखाल उत्तर हिंदुस्थानांत गव्हास प्राधान्य आहे. जोंधळा व बाजरी या देशांत वैपुल्यानें पिकत असली, तरी तें निकृष्ट अगर कमी पौष्टिक धान्य म्हणून गणले जातात. साधारणपणें १९२८-२९ च्या सुमारास या देशांत ३ कोटी टन तांदूळ पिके; पण पर्जन्य कालाच्या अवर्षणामुळें व जमीनींची प्रत हलका होऊं लागल्यामुळें, येथील तांदळाचे उत्पादन आता सरासरीनें २॥ कोटी टन वार्षिक होते. तसेंच गहूं १ कोटी टन, ज्वारी व बाजरी एक कोटी टन, हरबरा ३५ लाख टन वार्षिक पिकतो, असे हिंदुस्थान सरकारचे परवापर्यंत मंत्रीपदावर असलेले ना. सरकार यांचें म्हणणें आहे. १९४१-४२ सालीं तांदळाचें पीक अंदाजी ७ कोटी एकर जमिनींत असावें व गव्हाचें पीक तीन कोटी एकरांत असावें, असें सरकारी आंकडे आहेत. साधारपणें ब्रम्हदेश-

आदि देशाकडून आमच्या देशास वार्षिक १४ लक्ष टन तंदूळ येई. ना. सरकारांच्या मतें, हा ब्रह्मदेशाकडून येणारा तांदळाचा बंद झालेला पुरवठा जमेस धरून, इथें एकंदर २३ लाख टन तांदळाचा तुटवडा चालू वर्षी भासेल. याच्या उलट लखनौ युनिव्हर्सिटीचे अर्थशास्त्राचे प्रसिद्ध प्राध्यापक राधाकमल मुकर्जी यांच्यामतें, हिंदुस्थानास ब्रम्हदेशाकडून साधारणपणें २२ लक्ष टन तांदूळ वार्षिक मिळे. तो जमेस धरता, साधारणपणें ७० लाख टन तांदळाची वाण हिंदुस्थानास भासेल. गव्हाच्या बाबतींत मात्र ना. सरकार व प्रा. मुकर्जी यांचे एकवाक्यतेनें म्हणणें आहे कीं, चालू साली अंदाजी ३॥ लाख टनाची उणीव आमच्या देशास भासेल.

या दोन्हीं धान्यांच्या पुरवठ्याबाबत अखिल हिंदुस्थानचा विचार केल्यास असें आढळून येईल कीं, बंगाल, बिहार, संयुक्तप्रांत, मुंबई व मद्रास या प्रांतांना इतर प्रांतांच्या सहकार्यावर व मेहेरबानीवर नेहमी अवलंबून असावें लागते. उदा:—बंगालला वार्षिक अंदाजी ५ लक्ष टन तांदूळ, दोन लक्ष टन गहूं इतर प्रांताकडून मिळवावा लागे. तागाच्या लागवडीस प्रतिबंध केल्यानें, बंगालची तांदळाची उणीव आतां भरून निघाली असून, तो प्रांत आतां स्वावलंबी झाला आहे. एवढेंच नव्हे तर तो १३ लक्ष टन तांदूळ वार्षिक इतरांना पुरवूं शकतो. बिहार प्रांतांतहि वार्षिक दोन लक्ष टन तांदूळ व ३५ हजार टन गव्हाची तूट येते. मद्रास प्रांतास तर पांच सहा लक्ष टन तांदूळ इतरापासून मिळविल्यावाचून, चरितार्थाची सोयच होत नाहीं. इतके दिवस हा सारा तांदूळ मद्रास प्रांतास ब्रह्मदेश पुरवे. मुंबई प्रांतात तांदूळ पिकविणारी कोंकणपट्टी विस्तृत दिसली, तरी ती कोंकण भागाला सहा महिने पुरेल इतका तांदूळ सुद्धा पिकवूं शकत नाहीं. या दृष्टीनें मुंबई प्रांतांत वार्षिक अंदाजी पांच लाख टन तांदळाची व २॥ लाख टन गव्हाची तूट येते. तांदळापैकीं तिसरा हिस्सा पुरविण्याचा मक्ता ब्रह्मदेशा-

कडे होता, तर गव्हाचा मक्ता सिंध, पंजाब इ. प्रांतांनी उचललेला होता. संयुक्त प्रांतांत चालू साली अंदाजी सहा लक्ष टन तांदळाची तूट भासेल असें वाटते. या प्रांतास लागणारा तांदूळ बंगाल व मध्यप्रांत हे पुरवित असत.

पंजाब, सिंध व संयुक्त प्रांत या प्रांतांमध्यें त्यांची गरज भागून इतरांना पुरविता येईल इतकें गव्हाचें पीक वार्षिक होतें व अंदाजी वार्षिक पंजाबमध्यें २५ लाख टन, सिंधमध्यें १३ लाख टन व संयुक्त प्रांतात २१ लाख टन गहूं, त्यांच्या आपापल्या गरजा भागून शिल्लक उरेल असा अंदाज आहे. आसाममध्येंहि चालू सालीं बराच तांदूळ शिल्लक राहिला असून, तो इतर प्रांतांना पुरविला जाणार असल्याचें सरकारनें जाहीर केले आहे.

अशा तांदळाची वाण अगोदरच असलेल्या आमच्या देशावर सिलोनला जगविण्याचा वाढता बोजा येऊन पडलेला आहे, हे खालील येथून सिलोनकडे निर्गत झालेल्या तांदळाच्या आंकड्यावरून स्पष्ट दिसणारें आहे.

१९३९ मध्यें	९२ $\frac{3}{4}$ हजार टन.
१९४० मध्यें	१०३ $\frac{1}{4}$ हजार टन.
१९४१ मध्यें	१४९ हजार टन.
१९४२ मध्यें	१७६ हजार टन तांदूळ रवाना झाला.

चालू वर्षी या निर्गतींत पुष्कळ वाढच झालेली आहे. ही वाढती निर्गत येथील अन्न पुरवठ्याची परिस्थिति गंभीर झाल्यास बंद करणेंत येईल असें व्यापार मंत्र्याचें म्हणणें आहे. आता चालू परिस्थिति अधिक गंभीर व्हावयाची म्हणजे किती, तें एक सरकारच जाणे ! गेल्या शेंदीडशें वर्षांत तांदळाच्या किंमतीचें प्रमाण इतकें महाग झाल्याचें आपणास आढळून येत नाहीं. सिलोनआदि देशाकडे निर्गत होणारा तांदूळ थांबविल्या-

विना, आणि प्रांताप्रांतांतून देवाणघेवाण झाल्याविना तांदळाचा प्रश्न सुटूं शकत नाहीं, हें निर्विवाद आहे.

गव्हाचा प्रश्न.

गव्हाच्या बाबतींत आमच्या देशास वार्षिक साडेतीन लक्ष टनांची तूट येत असते. खुद्द हिंदुस्थानांत परकीय सैन्य जमा झालें असल्यानें, त्यांच्या आहारासाठीं, बराच गहूं सध्यां सरकार खरेदी करिते. इराककडील आघाडीकडेहि आमच्या देशांतील गव्हाचा लोंढा सतत वहात आहे. उदा. १९३९।४० मध्यें आठ हजार टन गव्हाची निर्गत, १९४१।४२ मध्यें एक लक्ष श्याऐंशी हजार टनापर्यंत वाढली. येथील सरकारनें गव्हाच्या आयातीवर असलेल्या मामुली कराची माफी जाहीर केली असली, तरी त्यामुळें बाहेरून आयात होणाऱ्या गव्हांत मुळींच वाढ झाली नाहीं. गेल्या वर्षी पंजाब, संयुक्तप्रांत व सिंध या प्रांतांनीं गव्हाच्या निर्गतीस बंदी केल्यानें इतर प्रांतांतून त्याचे भाव एकदम कडाडले. पुणें मुंबईसारख्या शहरीं बाजारांतून गव्हाचें दर्शन होईना, पावरोटीवाल्यांचा धंदा बसला. चालू वर्षाच्या प्रारंभीं गव्हाचा भाव नियंत्रित करण्याचा प्रयत्न सरकारनें सोडला, यामुळें परिस्थिति अधिकच बिकट झाली आहे. लोकांनीं गहूं दाबून ठेवला यामुळें तो आतां बाजारांतच येईना. सरकारी नवीन धोरणाप्रमाणें हिंदुस्थानचे सहा प्रांतिक गट कल्पून सहा अधिकारी (Regional Food Commissioners) नुकतेच नेमले आहेत. गेल्या वर्षी ऑस्ट्रेलियांतील गव्हाचें पीक जवळजवळ दुप्पट झालें आहे. त्यापैकीं सरकारनें जहाजांची सोय करून १६ लक्ष टन गहूं आणविल्याचें जाहीर झालें आहे. १९४२ जानेवारीपासून मध्यवर्ति सरकारने गव्हाच्या पुरवठ्याबाबत मुख्याधिकारी (Wheat Controller) नेमला, पण त्यानें गव्हाची योग्य वाजवी किंमत

न ठरविल्यामुळें व अंतर्प्रांतिक देवाणघेवाणीची व्यवस्था न केल्यामुळें, आज देशांत लोकांना गहूं मिळेनासा झाला आहे. सरकारनें दक्षतापूर्वक गव्हाच्या पुरवठ्याकडे लक्ष पुरविण्याची वेळ आतां खास आलेली आहे.

साखर

गेल्या दहापंधरा वर्षांत सरकारी संरक्षणाच्या छत्राखालीं आमचा देश साखरेबाबतींत स्वयंपूर्ण झाला. गेल्या युद्धांत आम्ही जावाकडील साखरेवर अवलंबून असल्याकारणानें, साखरेची किंमत भरमसाट दर शेरी रुपयाच्या पुढें गेली असल्याचें पुष्कळांच्या स्मरणांत असेल. पण आतां मात्र आम्ही आमची गरज भागवून, दुसऱ्या देशांनाहि पुरवूं शकतो. उदा. १९४० मध्यें दोन लाख टन आम्ही ब्रिटनला दिली आहे. अशा स्वावलंबी स्थितींत साखरेची दुर्मिळता व महर्गता भासते, यास खालील कारणें आहेत:—

(१) १९३१ च्या आर्थिक मंदीच्या वावटळीमध्यें गुळाचे भाव अत्यंत घसरल्यामुळें उंसाच्या लागवडीचे क्षेत्र कमी झाले. त्यांत विपुल उंसाची लागवड करणाऱ्या संयुक्त प्रांत व बिहार प्रांतांनीं उंसाच्या लागवडीस प्रतिबंध करून भर घातली. सुमारें ३।४ वर्षांपूर्वीं गुळाच्या किंमती किती घसरल्या होत्या व त्यापायीं उंस गाळण्याचा खर्च निभावेना म्हणून शेतकऱ्यांनी उंसाचे उभेचे उभे फड पेटवून दिल्याचें पुष्कळांना निदान ऐकून माहीत असेल.

(२) सर्वसाधारणपणें चढत्या बाजारभावाचा परिणाम साखरेवर होणें अपरिहार्य आहे.

(३) गुळाच्या किंमतीत बेसुमार वाढ होऊं लागल्यानें, शेतकरी पूर्वीप्रमाणें आपला उंस साखरेच्या कारखान्यास विकेनासा झाला.

(४) युद्धामुळें विशेषतः इराकइराणकडील आघाडीकडे साखरेचा लोंढा वाहूं लागला. त्यांत कावेबाज व्यापाऱ्यांनी इथें स्वस्त दरांत साखर खरेदी करून, इराकइराणमध्यें दसपट किंमतीस विकून, लोकांना लुबाडल्याची तक्रार, मर्चंटस् ऑफ असोसिएशनच्या अध्यक्षांनीं परवा केलेली विचारांत घेण्याजोगी आहे.

(५) जावासारख्या देशाकडून थोडीफार येणारी साखर इतःपर बंद झाली. उदा. १९४१–४२ मध्यें जावाहून आमच्या देशांत ४५ हजार टन साखर आयात झाली.

(६) साखरेप्रमाणें गुळाची किंमत नियंत्रित न केल्याकारणानें; गुळाची किंमत गेल्या महायुद्धांतील भावापेक्षाहि अधिक वाढून, तिनें उच्चांक गांठला. यामुळें लोक व्यवहारांत गुळाऐवजी साखरेचाच जास्ती उपयोग करण्यास पाहूं लागल्यानें, साखरेस मागणी वाढली.

(७) अंतर्प्रांतिक साखरेची देवाणघेवाण, कंट्रोल व वहातुकीच्या अडचणी ज्या इतर बाबतींत, त्याच साखरेच्या विषम वांटणीस जबाबदार असून, साखरेचे स्थानिक दुर्भिक्ष्य ठिकठिकाणीं आढळून येते.

हिंदुस्थानांतील साखरेची निर्मितिः—

१९३९—४०	—	१२ लाख ४१ हजार टन
१९४०—४१	—	१० लाख ९५ हजार टन
१९४१—४२	—	७ लाख ७८ हजार टन
१९४२—४३	—	१० लाख ७० हजार टन

गेल्या वर्षापेक्षा चालू मोसमांत साखरेची निर्मिति बरीच वाढली आहे. तसेंच यंदा संयुक्त प्रांत व बिहार हे प्रांत इतर प्रांतांना दोन लाख, साठ हजार टन साखर पुरविणार आहेत. गेल्या वर्षीं इराण वगैरे देशाकडे

सरकारनें पंधरा हजार टन साखर धाडली, सिलोनला दोन हजार टन उसनवार दिली व याशिवाय खासगी रीत्या पुष्कळच साखर परदेशी निर्गत झाली या गोष्टी सरकारनें मान्य केल्या. चालू वर्षी खासगी रीत्या साखरनिर्गतीस सरकारनें बंदी केली असून, अफगाणिस्थान, इराण वगैरे देशाकडे सुमारें पंधरा हजार टन साखर, म्हणजे देशांतील उत्पादनापैकीं फक्त दीड टक्का साखर निर्गत करणार असल्याचें सरकारनें जाहीर केलें आहे.

१९४२ मे महिन्यांत हिंदुस्थान सरकारनें साखरेच्या पुरवठ्याबाबत मुख्याधिकारी (Sugar Controller) नेमला. साखरेस तेजी आल्यानें देशांत फार काय महाराष्ट्रांत सुद्धा साखरेचे नवीन कारखाने झटपट उभारले जात आहेत. गुळाच्या भरमसाट किंमतीमुळें यंदा शेतकऱ्याजवळ मुबलक पैसा झाला असून, तो कागदी नोटांतून संचय करून ठेवण्याऐवजी जमिनी व घरें अशासारख्या स्थावरांत गुंतविण्याच्या यत्नांत असल्याचे दिसेल. यामुळें स्थावरांच्या किंमती पुष्कळच आज वाढलेल्या दिसतील. चांदीची किंमत भलतीच वाढली, एरव्ही यंदा शेतकऱ्यांनीं बैलाच्या गाडीच्या धांवासुद्धा चांदीच्या घातल्या असत्या. या सर्व गोष्टीमुळें यंदा उंसाच्या लागवडींत अचानक भरपूर वाढ झाल्याकारणानें, पुढील वर्षी धान्याचा तुडवडा अधिकच जाणविणार काय अशी साधार भीति वाटू लागली आहे.

पुढील वर्षी अमेरिकेहून येणारा गंधक मिळणार नसल्यानें, कदाचित पांढऱ्या शुभ्र साखरेऐवजी तांबूस खाकी साखर लोकांना मिळेल. एकंदरीत सरकारनें योग्य ती दक्षता घेतल्यास प्रत्येकास भरपूर साखर मिळण्यास मुळींच प्रत्यवाय दिसत नाहीं.

कापड

गेल्या महायुद्धापासून मँचेस्टरी कापडाचें युग संपून, जपानी कापडाचें युग अवतरलें. त्यावेळीं दर वर्षी साधारणपणें मँचेस्टर कापड ३०० कोटी चौरसवार इथें आयात होई व सुमारें २०० कोटी चौरस वार हिंदी गिरण्यांतून निर्माण होई. गेल्या महायुद्धांत व युद्धानंतर मँचेस्टरचा धंदा बसला. थोडे दिवस मँचेस्टरचा मान जपाननें पटकावला. पण संरक्षक जकातीमुळें हिंदी गिरण्यांतील कापडांचें उत्पादन दिवसेंदिवस वाढत जाऊन, आतां हिंदुस्थान स्वावलंबी बनण्याच्या मार्गांत आहे. गेल्या तीन वर्षांतील स्वदेशी गिरण्यांतील कापडांची पैदासः—

१९३९-४० — ४०१ कोटी चौरसवार,
१९४०-४१ — ४२७ कोटी चौरसवार,
१९४१-४२ — ४४५ कोटी चौरसवार,

याच प्रमाणांत येथील गिरण्यांतील सुताच्या निर्मितीतहि बरीच वाढ झाल्याचे दिसेल. १९४१-४२ सालीं इथें दोन कोटी २॥ लक्ष एकर जमिनींत कपाशीचें पीक होतें व अंदाजी त्यापासून ५५ लक्ष गांठी कापूस झाला. हिंदुस्थानास पुष्कळसें सूत पुरविण्याचा जवळजवळ मक्ता जपानकडे परवांपर्यंत होता.

चालू महायुद्धांत गेल्या दोन वर्षांत जपानी कापडाची आयात बंद झाली. हिंदी गिरण्यांतून लष्कराकरितां खाकी कापड पुष्कळसें निघूं लागल्यानें, नागरिकांना लागणाऱ्या नेहमीच्या कापडाच्या किंमती आज बेसुमार वाढलेल्या आहेत. १९४२ जून अखेर १२० कोटी रुपयांचें कापड लष्करी कारणाकरितां सरकारनें खरेदिलें. चालू वर्षी त्यांत भयंकर वाढच झालेली असणार. यामुळें आज येथील गोरगरीब लोकांपुढें आपलें शरीर

व लाज कशी झांकावयाची असा मोठा पेचप्रसंग येऊन पडला आहे. शिवाय सर्वसाधारणपणें प्रत्येक माणशी सरासरीनें वार्षिक ३० वार कापडाचें जागतिक प्रमाण पडते. तर हिंदी माणसाची सरासरी १७ वारापर्यंतच आहे. आतां कोठें सरकार जागे झाले असून, गोरगरिबांकरितां स्वस्त दराचें कापड काढण्याची योजना हाती घेतली आहे. त्या योजनेनुसार चालू वर्षाअखेर १५ कोटी वार कापड निघणार असून, मार्च १९४३ अखेर त्यांतील पहिला १॥ कोटी वारांचा हप्ता लोकसेवेस सुपूर्त झाला आहे. साधारणपणें महिना १० रुपयेपेक्षां कमी उत्पन्न असणाऱ्या गोरगरीबांना ६॥ आणे वाराप्रमाणें हें कापड मिळणार आहे. येथील प्रचंड लोकसंख्येस या सरकारी अपुऱ्या व तुटपुंज्या योजनेनें फारतर लंगोट्यापुरतेंच कापड मिळणार आहे.

इतके दिवस सूत व कापड यांच्या किंमती सरकारनें रोखून धरल्या नाहींत, म्हणून त्यामध्यें अनिर्बंध महागाई निर्माण झाली. सरकारनें नुकताच एक वटहुकूम जारी करून कपाशीच्या सर्व प्रकारच्या कायद्यावर व तेजीमंदीच्या व्यवहारावर बंदी बसविली आहे.

देशांतील कापडपुरवठ्याचा विचार करण्यासाठीं मुंबई येथें १ जून १९४३ला हिंदुस्थान सरकारचे उद्योगधंदे व पुरवठा खात्याचे चिटणीस मि. हैदरी यांच्या अध्यक्षत्वाखालीं एक परिषद भरून निर्णय घेण्यांत आला. परिषदेपूर्वी चालू कापडाच्या महागाईबाबतचा दोषारोप आपणावर येऊं नये, म्हणून गिरणीवाल्यांच्या संघानें जाहीर पत्रक काढून देशांत कापडाचा तुटवडा पडण्यास व भरमसाट किंमती वाढण्यास सरकारच जबाबदार असल्याचें जाहीर केलें. त्यांचे मतें " सरकारनें कापडाच्या निर्गतीवर नियंत्रण बसविणें जरूर आहे, ही गोष्ट आपण फार पूर्वी म्हणजे १९४१च्या सप्टेंबरमध्यें सुचविली होती, पण तिकडे सरकारनें पूर्णपणें दुर्लक्ष्य केलें

व याचा परिणाम युद्धापूर्वी जी दहा कोटी वार कापडाची निर्गत होत होती, ती १९४२ मध्यें दसपटीनें वाढून, शंभर कोटी वार कापड परदेशी गेलें. गोरगरिबांसाठीं स्वस्त दराचें स्टँडर्ड कापड काढावें हीहि सूचना १९४१ च्या डिसेंम्बरमध्यें आपण केली असतां, सरकारनें तिकडे काणाडोळा केला. सरकारच्या या हलगर्जीपणामुळें १९४२ मध्यें येथील जनतेस अवघें १८० कोटी वार उपलब्ध झाल्यानें, जनतेची गरज भागेना व बाजारांत कापडाचे भाव अमर्यादपणें वाढूं लागले. चालू वर्षी कापडाचें उत्पादन ४८० कोटी चौरसवार होईल व लष्करी गरजा भागवून किमानपक्षी ३६० कोटी वार कापड जनतेसाठीं बाजारांत विक्रीस येऊन, कापडाच्या किंमतीमध्यें थोडा उतार होईल."

मि. हैदरी यांनीं हिंदुस्थान सरकारची भूमिका विशद करून सांगितली. स्वस्त दराच्या कापडाची योजना तुटपुंजी, अयशस्वी झाली याची त्यांनीं कबुली दिली; व पुढील बारा महिन्याच्या अवधींत दोनशें कोटी वार स्वस्त दराचे कापड गरिबांकरिता काढणें, इतर कापडाच्या निर्मितींतहि वाढ करणें, त्याच्या कमाल किंमती ठरवून त्यांचे तयार झालेल्या तारखासह ठसे कापडावर मारणें, व्यापाऱ्यांच्या नफेबाजीला आळा घालणें, व्यापाऱ्याजवळच्या आजच्या सांठ्याची मोजदाद करणें व त्यांना सांठा करूं न देणें वगैरे गोष्टी करण्याचा सरकारचा निश्चय असल्याचा मनोदय त्यांनीं गिरणीवाल्यांना ऐकविला. ही योजना यशस्वी होण्यासाठीं गिरण्यांतून रात्रीसकट साडेसात तासांच्या तीन पाळ्या सुरूं करून, त्यांच्या यंत्रसामुग्रीची झीज भरून काढण्याची तरतूद करण्याचा सरकारचा विचार असल्याचें त्यानी जाहीरपणें सांगितलें.

प्रथमतः ही सरकारची योजना गिरणीवाल्यांना पसंत पडली नाहीं. अखेर उभयतामध्यें समझौता झाला, कापडउत्पादन व भावनियंत्रण या

कामीं गिरणीवाल्यांच्या प्रतिनिधींचा सल्ला सरकारनें घेणेचे मान्य केले. त्या तडजोडीप्रमाणें खालील गोष्टी घडून येण्याचा संभव निर्माण झाला आहे.

(१) आतापर्यंत गिरण्यांतून उत्पन्न होणाऱ्या शेंकडा ६० टके मालावरच सरकारचें नियंत्रण होते, तें आतां इतःपर सर्व उत्पादनावर नियंत्रण बसणार. आतां सरकार सांगेल त्या तऱ्हेचें व दर्जाचें कापड गिरण्यांना काढावें लागणार व सरकार मुक्रर करून देईल त्या दरासच तें विकण्याची सक्ति गिरणीवाल्यावर होणार.

(२) येत्या जुलैअखेर पंधरा कोटी वार स्वस्त दराचें कापड तयार होईल व पुढील सहा महिन्यांत आणखी शंभर कोटी वार स्वस्त कापड गोरगरिबांना उपलब्ध होईल. इतर कापडाच्या मानानें किमानपक्षी हें कापड निम्म्या किमतींत गरिबांच्या पदरांत पडेल.

(३) कापसांतील वायदे, तेजीमंदी व्यवहार बंद झाल्यानें, कापसाचे भाव कोसळून कदाचित शेतकऱ्यांचे नुकसान होईल, म्हणून त्यांचे भाव प्रमाणाबाहेर उतरल्यास; सरकार योग्य त्या दरानें त्या सर्व कापसाचा सौदा करील असें आश्वासन शेतकऱ्यांना देण्यांत आलें आहे.

सरकार व कारखानदार यांच्या दरम्यान तडजोड झाल्याप्रमाणें, हिंदुस्थान सरकारनें १६ जूनला गॅझेटद्वारें या बाबतची योजना व त्याचे नियम जाहीर केले आहेत. त्यामध्यें बिन सरकारी प्रतिनिधीच्या अध्यक्षत्त्वाखालीं पंचवीस प्रतिनिधींची एक कापड–सूत नियंत्रक समिती (Textile Control Board) स्थापन करणेंत आली आहे. तसेंच व्यापाऱ्यांनी ३१ जुलै अखेर त्यांच्याजवळ असलेला कापड–सुताचा सांठा, १५ ऑगस्टपर्यंत सरकारांत नोंदविला पाहिजे व तो सारा सांठा आक्टोबर अखेरच्या आंत विकून काढला पाहिजे असें फर्मावण्यांत आले आहे. शिवाय व्यापाऱ्यांनी इतःपर स्वत: जवळ किती कापड–सुताचा सांठा ठेवणेचा; त्याची

मर्यादा ठरविण्यांत आली असून, त्या सांठ्याची निर्गत अमुक इतक्या दिवसांत झालीच पाहिजे अशी सक्ती केली जाणार आहे. कापड-सूता बाबत सरकारनें नेमलेल्या अधिकाऱ्यास (Textile Commissioner) विस्तृत अधिकार या नियमांची अंमलबजावणी योग्य रीतीनें होण्यासाठीं मुद्दाम देण्यांत आले आहेत. याचा परिणाम ता. २४ जूनला सरकारला कापड व सूत यांचे वायदे व तेजीमंदीचे सर्व प्रकारचे व्यवहार याना बंदी करणारें फर्मान काढणें क्रमप्राप्त झाले.

आजवर स्वस्त दराच्या कापडाची योजना यशस्वी झाली नाहीं, याचें कारण ती मुख्यतः तुटपुंजी होती व शिवाय त्या कापडाची रुंदी धोतराच्या दृष्टीनें अपुरी व साड्यांचा रंग पांढरा व रुंदी लांबी कमी, यामुळें तें कापड गरिबांना फारसे उपयुक्त झालें नाहीं. सरकार व गिरणीवाले यांनीं एकमतानें संकल्प केल्याप्रमाणें या नवीन योजनेस यश लाभो व गरिबांचे शरीर व लाज झांकली जावो, एवढेंच आम्ही इच्छितो.

रॉकेल व रबर

गेल्या युद्धांत कंट्रोलमुळें रॉकेलची किंमत बेसुमार वाढली होती व ते मिळविणें किती मुष्किलीचें झालें होते, हें पुष्कळांच्या स्मरणांत असेल. चालू युद्धांत जोंवर ब्रम्हदेश ब्रिटिशांच्या हातीं होता, तोंवर आमच्या देशांत रॉकेलची मुळींच ददात पडली नाही. त्यानंतर मात्र ही वाण भासू लागली आहे खरी. तरीपण जोंपर्यंत इराक-इराणमधील तेलांच्या खाणींचें स्वामित्व ब्रिटिशांकडे आहे, तोंपर्यंत महत्प्रयासानें का होईना हिंदी लोकांना थोडेफार रॉकेल मिळत राहील. शिवाय ब्रम्हदेशाचा कब्जा सोडण्यापूर्वी तेथील रॉकेलचे प्रचंड सांठे ब्रिटिशांनीं इथें आणविले आहेत, तेही दोनतीन वर्षपर्यंत पुरूं शकतील.

मलाया, डचांचीं पूर्वेकडील मसाल्यांचीं बेटें गेल्यानें, ब्रिटिशांचें अपरिमित नुकसान झाले आहे. तेथील रबराचे प्रचंड मळे भांडवलासह हातचे गेल्यानें, आज दोस्तांना रबराच्या पुरवठ्याचा मोठाच पेंच पडला आहे. आता कोठें रबराची विस्तृत प्रमाणावर लागवड करण्याची योजना सरकारनें आंखली आहे. १९४२ जून अखेर आमच्या देशांत रबराच्या लागवडीखालीं १३॥ हजार एकर जमीन होती, त्यापैकीं ३/४ क्षेत्र त्रावणकोर संस्थानांत आहे. चालू सालीं तें क्षेत्र वीस हजार एकरापर्यंत वाढविण्याचा सरकारचा कृतनिश्चय आहे. यापूर्वी सरकारनें हा प्रयोग इथें केला असता तर आज दोस्तांना ही अडचण भासते ना !

सोने चांदी

सोन्याची किंमत तोळ्यास ९६ रुपये व चांदीची शंभर तोळ्यास १३० रुपयापर्यंत गेल्याचें आपण नुकतेच पाहिलें. सोन्याचांदीच्या भावांत जणू ही अंतिम सीमाच गांठल्याचें वाटतें. पण या तेजीस दोन कारणें प्रामुख्यानें सांगतां येतील. युद्धविषयक चिंतेमुळें व सध्या जो कागदी नोटांचा अनिर्बंध फैलाव समाजांत झाला आहे, त्यामुळें जो तो आपला पैसा या धातूंमध्यें गुंतवूं इच्छितो. या धातू प्रचंड प्रमाणावर गेल्या अनेक वर्षांत परदेशी गेल्या कारणानें, त्या अगोदरच दुर्मिळ झाल्या आहेत. ब्रिटनला चलनासाठी व युद्धोपयोगासाठीं; अमेरिकेनें ३० लक्ष औंस चांदी नुकतीच पुरविली त्याची परतफेड युद्धानंतर चांदींतच व्हावयाची आहे. अशाच प्रकारचा करार ऑस्ट्रेलिअन सरकारबरोबर अमेरिकेनें नुकताच पुरा केला आहे. या गोष्टीमुळें येथील चांदीस मागणी येईल अशा अपेक्षेनें, येथील बाजारांत चांदीच्या भावानें एकदम इतकी झडप घेतली असावी.

हिंदुस्थान सरकारनें ता. १९ मे १९४३ रोजीं फर्मान काढून, सोने-चांदी बाजारांतील वायद्याच्या व तेजीमंदीच्या व्यवहाराला बंदी केली; व हें फर्मान न जुमानणाऱ्यांना शिक्षा ठेवण्यांत आल्या आहेत. ता. १ जून १९४३ ही लंडनच्या बाजारांत इंग्लंडची चांदी संपण्याची अखेरची तारीख म्हणून अमेरिकेंत मानली जाते. आणि साधारणपणें लौकरच ५० लाख औन्स अमेरिकन चांदी लंडन बाजारांत विक्रीस येईल असा अंदाज आहे. इंग्लंड फोटोला लागणारी फिल्म तयार करण्यांत अग्रेसर असल्यानें, त्याप्रीत्यर्थ तिथें चांदीचा बराच खप होतो. जुन्या फिल्मपासून अवश्य ती चांदी पैदा करण्याचा शोध नव्यानें निघाला असल्यानें, त्या मानानें आतां या धंद्यास कमी चांदी लागेल. याचाहि परिणाम चांदीच्या भावावर होणें अपरिहार्य आहे. शिवाय सोन्याचांदीच्या भावांनीं इथें उच्चांक गांठल्यावर, सोन्याचे भाव जसे झपाट्यानें एकदम घटले, तसे चांदीचे घटले नाहींत. याचें कारण येथील खेडेगांवच्या लोकांमध्यें सोन्यापेक्षां चांदीचा सांठा करणेची प्रवृत्ति अधिक आहे. सोन्याचांदीचे भाव खरोखरी घटावयास पाहिजे असतील तर एक, सरकारनें कागदी चलनाचे बाबतींत हात आंखडता घेतला पाहिजे व दोन, सरकारनें स्वतः जवळची सोनेचांदी प्रत्यक्ष बाजारांत विक्रीस काढली पाहिजे. पण सरकारजवळ विकाऊ सोन्याचांदीची वानवाच आहे.

इतर

शेंगदाणे भाजून ते पूर्वेकडील आघाडीवरील हिंदी लष्करास पुरवठा होऊं लागल्यानें, शेंगदाण्याच्या किंमती सांप्रत कडाडल्याच्या दिसतील. त्यांत ब्रिटिश अन्नखात्यानें आपला शेंगदाणाखरेदीचा भाव वाढविल्याकारणानें, शेंगदाण्याच्या वायद्याचे दर सट्टेबाजांनीं वाढविले आहेत. या देशांत

सिगारेटसचा धंदाहि बराच वाढलेला आहे. व्हर्जिनिया नामक उत्तम तंबाखूची लागवड इथें बऱ्याच विस्तृत प्रमाणावर होते. यामुळेंच विलायतेंत दहा सिगारेटस्च्या एका पाकिटाचा दर एक शिलिंग दोन पेन्सपर्यंत वाढला असता, इथें मात्र तो फारसा वाढला नाहीं. काड्याच्या पेट्यांचे आमच्या देशांत परकीयांच्या मालकीचे बरेच कारखाने आहेत. स्वीडनकडून येणाऱ्या आगपेट्या आता बंद पडल्या असल्या तरी, फारशी गैरसोय आमची होऊं नये, अशी परिस्थिति आहे. पण काबेबाज व्यापाऱ्यांनीं आगपेट्यांचे मोठाले सांठे करून, चोरबाजार उघडले असल्यानें, या गोष्टीची दुर्मिळता आज आम्हास नडवित आहे. हिंदी लोकांना सुपारी खाण्याचें एक वेडच आहे. इतके दिवस बरीचशी सुपारी मलाया, जावा, सुमात्राआदि मसाल्यांच्या बेटांकडून येई. ती मिळेनाशी झाल्यानें, आता फक्त कोंकणपट्टीतील सुपारीवर तल्लफ भागविण्याची पाळी आम्हांवर आली आहे. म्हणून सुपारी इतकी महागलेली दिसते.

भावनियंत्रण नि शिधापद्धत

भावनियंत्रणासाठीं परिषदांचा खेळ.

सद्यःकालीन परिस्थितीस सरकारचें बाजारभाव नियंत्रणाबाबतचें धरसोड वृत्तीचे व चुकीचें धोरणहि कारणीभूत आहे. १९३९च्या ऑक्टोबरमध्यें भावनियन्त्रणपरिषद पहिल्यांदा भरली, व तीमध्यें भावनियन्त्रणाच्या फंदात सरकारनें पडूं नये असा निर्णय घेण्यांत आला. याचें कारण १९३१ पासून आर्थिक हलाखीच्या भोवऱ्यांतून हिंदी शेतकऱ्यांची सुटका होण्याचा समय आतां प्राप्त झाला असतां, त्याच्या आड सरकारनें येऊं नये असा सल्ला परिषदेनें दिला. १९४० च्या जानेवारींत भरलेल्या दुसऱ्या परिषदेनें भावनियंत्रणाच्या तत्त्वांना मान्यता दिली, पण त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी होण्यापूर्वींच, १९४० जूनमध्यें फ्रान्सच्या पतनामुळें बाजारभाव घसरले व भावनियंत्रणाची आवश्यकताच नष्ट झाली. १९४१ च्या ऑक्टोबरांत व १९४२ च्या फेब्रुआरींत ३ री व ४ थी परिषद भरली व प्रादेशिक भावनियंत्रक समित्या नेमल्या गेल्या. पण कृषिप्रधान मालाच्या किंमती बाजारांतील मागणीच्या मानानें कमी ठेवल्यानें, चोरबाजारांचा सुळसुळाट झाला व सरकारी नियंत्रणाचा केवळ फार्स झाला. यावर उपाय ह्मणून सरकारनें स्वस्त धान्यांची दुकानें स्वतःच उघडण्याचा उपक्रम केला, पण तो अत्यंत अपुरा व तुटपुंजा ठरला. लोकांच्या पोटांत आगीचा डोंब उसळला असतां, त्यांना चिमुटभर अन्न देण्यापैकीं प्रकार झाला. कारण अशा दुकानापुढील रांगा हटविण्यासाठीं पोलिसांना लाठीमारसुद्धां करावा लागला. त्यानंतर भरलेल्या ५ व्या व ६ व्या परिषदांमध्यें

अंतर्प्रांतिक देवाण घेवाण, गव्हाचा पुरवठा व भाव, घाऊक व्यापाऱ्यांना परवाने, भावनियंत्रक समित्यामध्यें व्यापाऱ्यांना प्रतिनिधित्व इ. गोष्टी ठरविण्यांत आल्या.

प्रथमपासून सरकारला आगामी संकटाची योग्य व पुरेशी कल्पना नसल्यानें हा सारा खेळखंडोबा झाला. परिषदांवर परिषदा भरून, लांबचलांब भाषणें होऊन ठरावांची भेंडोळी निर्माण झाली. पण त्यापासून फलनिष्पत्ति मुळींच झाली नाहीं. अद्यापहि देशाचा अफाट विस्तार, प्रचंड लोकसंख्या, वहातुकींतील अडचणी व मालाचें उत्पादन व पुरवठा या दृष्टीनें योग्य ती कल्पना सरकारला नाहीं, असें कष्टानें ह्मणणें भाग पडते. यामुळेंच सरकारच्या योजना अपुऱ्या, असमाधानकारक व अयशस्वी ठरत आहेत.

वैयक्तिक वा सामुदायिक शिधापद्धत

मुंबई पुण्यासारख्या मोठमोठ्या शहरांतून शिधापद्धत (रेशनिंग) सुरू करण्याच्या यत्नांत सरकार सध्यां गुंतले आहे. तसेच हरेक प्रांतांतून त्यांच्या गरजा भागून शिल्लक उरणारे धान्य, इतर गरजू प्रांतांना पुरविण्याची योजना सरकारनें आंखली असून, त्यासाठीं हिंदुस्थानचे संस्थानासकट सहा प्रादेशिक गट पाडणेत आले आहेत. आणि त्या प्रीत्यर्थ सहा मुख्याधिकारी (Regional Food Commissioners) नेमण्यांत आले आहेत. देशांतील अन्नादि पदार्थांचे वाढतें उत्पादन होऊन त्यांच्या किंमती ठराविक पातळीच्या खालीं उतरल्या गेल्यास, सरकार स्वतः बाजारांत उतरून तो माल खरेदून, शेतकऱ्यांचे नुकसान होऊं देणार नाहीं, असें आश्वासन सरकारनें दिलें आहे. तसेंच ब्रिटनमधील पुरवठा खात्यांतील तज्ञ मि. कीर्बी यानाहि सल्ला देण्यास्तव सरकारनें या

महिन्यांत मुद्दाम बोलावून आणविले आहे. पहावें या सर्व सरकारच्या संकल्पांपासून प्रत्यक्ष कार्यनिष्पत्ति काय होते ती?

पण एक गोष्ट मात्र निश्चितपणें सर्वांनीं लक्षांत ठेविली पाहिजे कीं वैयक्तिक शिधापद्धत अगर सामुदायिक शिधापद्धत अंमलात आणल्याविना, बाजारभावाचें नियंत्रण केव्हाहि प्रभावी व यशस्वी होऊं शकणार नाहीं. अशा प्रकारची शिधापद्धत हिंदुस्थानसारख्या अफाट लोकसंख्येनींयुक्त अशा विस्तीर्ण भूप्रदेशांत कशी अंमलांत आणता येईल, हा मोठाच बिकट व गुंतागुंतीचा प्रश्न आहे. अगंठीवरच्या राज्याप्रमाणें ब्रिटन असल्यामुळें मोठ्या प्रयासानें तिथें ही पद्धत यशस्वी होऊं शकली. तरी तेथील परिस्थिति आज कशी आहे तें पहा.

ब्रिटनला अमेरिकेचें अन्नसहाय्य.

अन्नपुरवठ्याच्या दृष्टीनें ब्रिटन स्वयंपूर्ण नाहीं; तरीपण तिथें शेतीचें उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीनें नेटानें प्रयत्न झाले. युद्धारंभापासून तेथील शेतींत साठ लक्ष एकर जमीन नव्यानें लागवडीत आणली गेली आहे व चालू साली दहा लक्ष एकर पडीक जमीन लागवडींत आणली जाणार आहे. वाढत्या शेतीकडे वाढते मनुष्यबळ खर्च होऊं नये, म्हणून शेतकीविषयक यंत्रसामुग्रींतहि भर घालण्यांत आली आहे. युद्धापूर्वी तिथें ५२ हजार यांत्रिक नांगर कार्य करीत, त्यांची संख्या आता अडीच पटीनें वाढली आहे. मुळापासून परावलंबी असलेल्या त्या देशास, अमेरिकेच्या प्रचंड मदतीनें चालू परिस्थितींत तारले आहे. ब्रिटन आपल्या गरजेपैकीं फक्त शेंकडा ३७ टक्के अन्न निर्माण करूं शकते. अमेरिकेनें दूधाचें पीठ ५०० कोटी पौंड पुरविलें. हें अर्ध्याफूट व्यासाच्या नळींत ओतले, तर त्याची तीनदा पृथ्वीप्रदक्षिणा होईल एवढ्या लांबीची नळी लागेल.

अमेरिकेनें पुरविलेलीं डुकरें दीड फूट अंतरानें उभी केलीं, तर अमेरिकेच्या उत्तर टोंकापासून दक्षिण टोंकापर्यंत त्यांची रांग बनेल. याशिवाय ५० कोटी डझन अंडीं, पाउणेदोन कोटी कोंबड्या व अगणित भाजीपाला इ. अमेरिकेनें पुरविल्यामुळें आज ब्रिटनचा तरणोपाय लागला. इथें ऑस्ट्रेलिअन गहूं आणावयाचा तर सरकारजवळ पुरेशी जहाजें नाहींत.

इंग्लंडमधील दैना

अशा समृद्धीच्या कालांतहि विलायतेतील लोकांची दैना व कंगालपणा कसा झाला आहे, याचें शद्बचित्र परवा टाईम्समध्यें येणाऱ्या लंडनच्या बातमीपत्रांत व्यतीत झाले आहे. " इंग्रज माणसानें नासाडलेल्या जिन्नसावर फ्रेंच मनुष्य उत्तम प्रपंच करूं शकतो, अशी म्हण प्रचारांत आहे. या दृष्टीनें इंग्रज माणसाच्या हाडीमासी खिळलेल्या खर्चिक व नासाडी प्रवृत्तीस आळा घालण्यास सरकारला भगीरथ प्रयत्न करावे लागले. खुद्द लंडनमध्यें टेम्स नदींत रोज सकाळीं कागदाच्या चिटोऱ्यांच्या लाखों गाड्या लोटल्या जात. पण आता तिथें साधा कागदाचा चिटोरा जाळणें हा कायद्यानें गुन्हा ठरविला असून, त्याबद्दल शिक्षा होते. यामुळें लाखो-टन नाशवंत कागदाच्या रद्दीची बचत होते. पावाचा तुकडा अगर सुतळीचा तोकडा फेकून देणें हा गुन्हा मानला जातो. जेवणांतील सूप-नामक पदार्थांत, टाकाऊ कोबीजच्या पाण्याचा अंतर्भाव आता होऊं लागला असून, लोक ते पाणी मिटक्या मारीत आवडीनें पिऊं लागले आहेत. जेवणासाठीं लागणाऱ्या काट्याचमच्यांची लांबीरुंदी छाटण्यांत आली असून, जेवतांना मांडीवर घेण्याच्या टॉवेलांना (Napkins) छाट देण्यांत आला आहे. नवीन कपड्यांची तर भाषाच सोडा. पण जुन्या फाटक्या कपड्यांना टांके घालून गुजरण करण्याची पाळी लोकांवर आली आहे.

कपड्यालत्यांचा षोक असलेल्या लोकांत किती गबाळपणा आला असेल, पहा! पण सारेच गबाळ झाल्यानें, कोणी कोणास नांवें ठेवित नाहीं. अंगांतील जॉकीट, टर्नकपचे सदरे, डबल ब्रेस्टचे कोट वगैरे निष्कारण जास्त कापड लागणाऱ्या गोष्टी, सरकारनें कायद्यानें बंद केल्या आहेत. एवढी हिंवाळ्यांतील कडक थंडी, पण तेथील मुलींनीं पायमोज्याशिवाय दिवस काढले. सरकारदरबारांत व समाजांत वापरतांना स्त्रियांचे पाय उघडे दिसणें म्हणजे जिथें अब्रम्हण्यम्, तिथें ती गोष्ट सर्वांच्या नित्य सरावाची झाली आहे."

या युद्धकालीन काटकसरी वागणुकीचा इंग्रज माणसाच्या नित्य जीवनावर स्थायी स्वरूपाचा परिणाम होणार व एकप्रकारचें सामाजिक जीवन आजच्या क्रांतीनंतर बदलणार, असें तेथील लोक बोलूं लागले आहेत. पण याचें उत्तर एक भविष्यकालच देण्यास समर्थ आहे. या शिधापद्धतीमुळें जे सुखदु:ख अन्नाच्या व कपड्यालत्यांच्या बाबतींत गोरगरीबांच्या तिथें वाट्याला आले आहे, तेवढेच धनाढ्यांना पैसे खर्च करण्याची ऐपत असूनहि मिळावे, अशी सरकारची योजना आहे. यामुळें तिथें गैरसमज, असमाधान व यायोगें होणारा लोकक्षोभ सरकारला टाळता आला*.

खाद्यपदार्थांच्या पुरवठ्याबाबत परिषदा भरविण्यांत आल्या, भावनियंत्रण परिषदांची छोटीमोठी नाटकें झालीं, स्वतंत्र अन्नपुरवठा खात्याचा थाट मांडण्यांत आला, प्रांतानिहाय बडेबडे अंमलदार नेमले गेले, धान्यादि

(* They are signs of Social Revolution...... "We do not mind going short, if no one is better off. . . The millionaire is no better fed than the wageworker, because the millionaire may pay 15 shillinge for a dinner at Ritz Carlton, but Bill Johns gets as good a meal at the British Restaurant for fifteen pence, ")

पदार्थांचें पिकाऊ क्षेत्र वाढविण्यासाठीं खूपसा प्रचार व पुष्कळसा पैसा खर्च झाला, इतक्या साऱ्या गोष्टी होऊन देशांतील अन्नवस्त्राची महागाई कमी न होतां दिवसेंदिवस वाढत्या श्रेणीनें लोकांना त्रस्त करूं लागली आहे. आणि या खडतर जीवनसंग्रामांतून कसें बचावणार याची विवंचना आज प्रत्येकास लागली आहे. युद्धकालीन सर्वांगिण प्रखर महागाईची कारण-मिमांसा इतका वेळ आपण केली. त्या महर्गतेवर कांहीं तोडगा आहे काय व असल्यास तो कोणता, असा साहजीकच प्रश्न उद्भवतो. इतका वेळ केलेल्या विवेचनाच्या दृष्टीनें, याहि प्रश्नाचा थोडक्यांत विचार करूं.

स्वस्त पैसा

चढते बाजारभाव चांगले कां पडते बाजारभाव चांगले, हा वाद न मिटण्यासारखा आहे. कारण दोन्हीहि अवस्था मनुष्यास तितक्याच कष्टप्रद होतात, असें अनुभवास आले आहे. चढत्या बाजारभावाच्या कालांत लोकांच्या हातीं पैसा खुळखुळूं लागतो, पण उपासमार होतेच आणि पडत्या बाजारभावाच्या कालांत लोकांना पैशाचें दर्शन घडत नाहीं आणि बेकारीमुळें हात जोडून स्वस्थ बसण्याची व उपासमारीची पाळी येते. म्हणून बाजारभाव स्थिर व कायम राहणें हेंच लोकांच्या दृष्टीनें हितप्रद व अंतिम कल्याणकारक ठरतें. एवढें मात्र इमखास, चलन फुगवून बाजारभाव वाढवून, लोकांना भरभराटीचा आभास उत्पन्न करणें, हें अंतिम परिणामाच्या दृष्टीनें अत्यंत अनिष्ट व विघातक. उदाहरणार्थ, हिंदुस्थानांतील आजच्या परिस्थितीकडे थोडें बारकाईनें पहा. कृत्रिम चलनवाढीच्या धोरणामुळें आज सरकारचा दृश्य असा एकच फायदा झाला आहे. आणि तो म्हणजे हा कीं, गेल्या युद्धाप्रमाणें चालू युद्धांत व्याजाचे दर बिलकूल वाढले नाहीत. लोकांच्या हातांत पैसा वैपुल्यानें खेळूं लागल्यानें, सरकारनें कर्ज काढ-

ण्याचा अवकाश, कीं कांहीं थोड्या तासांतच त्याची भरती लोक करितात. सरकारला स्वस्त पैसा मिळाला खरा (Cheap Money), पण लोकांच्या वांट्यास किती कष्टप्रद गोष्टी आल्या.

महर्गतेचे दुष्ट परिणाम

सरकारच्या या कृत्रिम चलनवाढीचा अत्यंत अनिष्ट पर्यवसान, आज आमच्या देशामध्यें गरीब व श्रीमंत यांच्या दरम्यानचें अंतर वाढण्यांत होत आहे. श्रीमंतांची श्रीमंती लाख कोटीच्या श्रेणीने वाढत चालली आहे, आणि याच्या उलट गरिबांची गरिबी त्याच श्रेणीनें खालावत आहे. समाजांतील मूठभर धनिकवर्ग अगर भांडवलवाले गब्बर होत जाणें आणि बहुसंख्य दरिद्री, भोळी जनता गरीब, उपासपोटी व असमाधानी बनत जाणे, ही घटनाच मुळांत पुष्कळ अनिष्ट गोष्टींचे माहेरघर आहे. श्रीमंत आणि गरीब यांच्यामधील दुवा म्हणजे मध्यमवर्ग. तो तरी आज सुखी आहे काय ? याचे उत्तर नाहीं, असेंच मोठ्या कष्टानें देणें भाग पडते. विशेषतः नोकरी, पगार, खंडासारखें ठराविक कायम उत्पन्न मिळविणाऱ्या मध्यम वर्गाचे हाल तर सध्या पुसूंच नका ! महर्गतेच्या कालांत घरची कुटुंबांतील बायकामुलें पोसण्याजोगें आर्थिक त्राण त्यांच्यात नाहींच, पण पैसा असूनहि अन्न न मिळण्याच्या विचित्र घटनेमुळें तो अगदी काकुळतीस आला आहे. हा सुशिक्षित, समंजस व शांतताप्रिय मध्यमवर्ग उपासपोटी व असंतुष्ट राहणें हें सामाजिक स्थैर्याच्या दृष्टीनें ठीक नाहीं, असेंच कोणीहि म्हणेल.

महागाईचें दुष्ट चक्र

साधारणतः युद्ध चालू असेतोंपर्यंत सरकारी चलनविषयक धोरण

असेंच चालू राहिल्यास; लोकांची उपासमार व देशांतील महर्गता अशीच वाढती राहणार, हें आतां निराळें सांगावयास नको. पण युद्धानंतरहि वाढत्या महर्गतेची प्रचंड लाट देशांत कोणता प्रसंग घडवून आणेल, याची कल्पनाहि करवत नाहीं. कारण भूतलावरील ज्या ज्या विभागांत हा महा-युद्धाचा वडवाग्नि सध्यां मनसोक्त हैदोस घालीत आहे, तिथें किती विध्वंस व राखरांगोळी होत आहे, याचें साधें वर्णनसुद्धां आपल्या अंगावर रोमांच उभे करण्यास पुरेसें आहे. या साऱ्या उध्वस्त विभागांतील कोट्यावधि दीन पीडित लोकांना अन्नवस्त्राचा पुरवठा कसा करावयाचा, हा मोठा पेंचप्रसंग आजच दोस्त राष्ट्रांतील मुत्सद्यांना निद्रानाश करण्यास समर्थ झाला आहे. या दृष्टीनें युद्धोत्तर सर्व जगांतील अन्नवस्त्रपुरवठ्याचा प्रश्न व युद्धोत्तर आंतरराष्ट्रीय चलनाचा प्रश्न सोडविण्यांत, दोस्तराष्ट्रांतील मोठमोठे तज्ञ गर्क झाले आहेत. ते प्रश्न कसे सोडविले जातील ते जावोत म्हणा, पण गेल्या युद्धाप्रमाणें याहि युद्धानंतर दोन तीन वर्षें तरी निदान, उध्वस्त झालेल्या राष्ट्रांकडे तेथील लोकांचे हाल वांचविण्यासाठीं आमच्या देशांतून अन्न-वस्त्राची प्रचंड निर्गत चालू राहणार व त्यामुळें आमच्या देशांतील अन्न-वस्त्राचें दुर्भिक्ष्य व महागाई कायम रहाणार, हें उघडउघड दिसत आहे. इतकी तग मारण्याचे त्राण आज बहुसंख्य हिंदी लोकांच्या अंगीं राहिले आहे काय? आणि याहिपेक्षां या महर्गतेच्या कालानंतर पुनश्च, निरनिराळीं राष्ट्रें सांवरलीं जातील व यांत्रिक राक्षस अवाढव्य उत्पादन करूं लागतील, तेव्हां येथून होणारी प्रचंड निर्गत थांबेल. आणि चक्रनेमिक्रमेण आर्थिक हला-खीचें चक्र फिरूं लागले, म्हणजे आमच्या लोकांचे हाल कुत्रें खाणार नाहीं. उदाहरणार्थ आजच लष्करामध्यें, संरक्षण, लष्करी व मुलकी खात्यामध्यें लाखों मध्यमवर्गांतील सुशिक्षितांची वर्णी लागलेली आहे. युद्ध संपतांच या लाखों सुशिक्षित बेकारांची सोय सरकार कशी लावणार, हा एक प्रश्नच

आहे. पण आज अशा लोकांच्या हातीं व मजुरांच्या हातीं महागाई भत्ता, बोनस वगैरे स्वरूपांत पुष्कळ पैसा येत आहे, आणि पर्यायानें हा पैसा महागाई वाढविण्यासच कारणीभूत होत आहे. कारण त्यायोगें समाजांतील अपुरा सांठा हस्तगत ते करूं लागतात. आणि महाग वस्तू मिळविण्यास सरकारला येणारा जादा खर्च, जादा नोटा छापून सरकार भागवीत सुटलें आहे. असें हें महागाईचें दुष्ट चक्र दिवसेंदिवस अधिक गतिमान होत राहिल्यानें, ही महागाई लोकांना अधिकच भोगावी लागणार असें नाइलाजानें म्हणणें भाग पडते.

लोकांच्या अन्नवस्त्रादि नित्य गरजांच्या वस्तूंचा अभाव वा दुष्काळ दूर करण्यासाठीं, सरकारनें अत्यंत काळजीपूर्वक व कल्पकतेने योजना आंखणें भाग आहे. त्याशिवाय भावनियंत्रणाचा सारा खटाटोप व्यर्थ आहे. वस्तूंच्या किंमती अशाच वाढत जाणें, त्यांचें दुर्भिक्ष्य भासणें, कमाई वाढणे, राहणीचें मान वाढणें व चलन फुगणें इत्यादि कृत्रिम श्रीमंतीचीं व भरभराटीचीं लक्षणें होत. या दृष्टीनें इतका वेळ केलेल्या विवेचनाचा सारांश व त्या अनुसंधानानें उपाययोजना यांचें संक्षिप्त टिपण देऊन, हा लांबलेला प्रबंध पुरा करूं.

महागाईवर खास तोडगे

(१) देशांतील मोठमोठ्या शहरांतून इंग्लंडप्रमाणें वैयक्तिक शिधापद्धत (Individual Rationing) व इतर विभागांतून सामुदायिक शिधापद्धत (Collective Rationing) यांचा अम्मल तात्काळ होणें जरूर आहे.

(२) चोरबाजारांचें निर्दयपणें निर्मूलन व सट्टेबाजावर कडक नियंत्रण बसणें भाग आहे.

(३) कागदी चलन भरमसाटपणें फुगविण्यांत सरकारनें हात आंखडता घेतल्याविना गत्यंतर नाहीं. पण ही गोष्ट सरकारला अद्यापही पटल्याचें दिसत नाहीं. कारण २५ जून १९४३ ला रिझर्व बँकेनें जाहीर केलेल्या पत्रकावरून, देशांतील कागदी चलन ७२३ कोटीचे असून, त्यास तारण म्हणून विलायतेंतील स्टर्लिंग पौन्डांचे रोखे ५५४ कोटी पौन्डाचे झाले आहेत.

४. प्रत्येक प्रांत स्वयंपूर्ण नाहीं हें ध्यानांत घेऊन एखाद्यानें आधाशीपणानें सांठवून, इतरांची उपासमार करणें योग्य होणार नाहीं. हा प्रांताप्रांतांतील शिलकी माल योग्य भावानें सरकारनें खरेदून, इतर गरजू प्रांतांना पुरविला पाहिजे.

५. येथील अन्नाचा अपुरेपणा लक्षांत घेऊन, येथून धान्यादि पदार्थांची परदेशीं होणारी निर्गत सरकारनें तात्रडतोब थांबविणें भाग आहे.

६. खंडोगणति धान्य सरकार लष्कराकरितां सांठवून ठेऊन कुजवते, हा प्रकार बंद झाला पाहिजे. आपले लष्कर किती, त्याची गरज किती याची मोजदाद करून, मगच जरूर तेवढा धान्याचा सांठा सरकारनें केला पाहिजे. लष्करी कारणाकरिता जरूर तेवढेच धान्य खरेदी करण्याचे सरकारनें ठरविल्यास, अशी आपत्ति उद्भणार नाही. लष्कराकरितां लागणारी खरेदी सरकारनें जरूर लागेल तशी वेळोवेळीं करावीं. बाजार अडवून केलेली एकदम खरेदी सरकारला प्रथम स्वस्तांत पडली, तरी त्या अवास्तव खरेदींतील अर्धामुर्धा माल जागचेजागीं पडून, सडू व किडू लागतो, व अखेर एकंदरींत तो सौदा सरकारला महागच पडतो. आणि मग तो किडका माल नागरिकांच्या गळ्यांत बांधण्याचा अनवस्थाप्रसंग सरकारावर येतो. पुण्यासारख्या मोठ्या शहरवासीयांच्या नशिबी, आळ्याकिड्यांनीं बुजबुजलेला आटा, किडून कडवट झालेली बाजरी आणि किड्यांनीं

पोखरलेल्या जोंधळ्यांच्या फुंकण्या इ. गोष्टी येणार नाहींत. याचा परिणाम देशांत कॉलरा, हगवण सारख्या साथींचा प्रादुर्भाव होत चालला आहे. ज्या त्या प्रांतांतील लोकांच्या आहारांतील वैशिष्ट्याप्रमाणें त्यांना धान्य पुरविण्याची सोय सरकारनें करावयास हवी. कारण लोकांच्या राहणींत व आहारांत चुटकीसरशी फेरबदल होणें अशक्य आहे. बाजरी न पचणाऱ्या महाराष्ट्रीयांच्या आहारांत गेल्या वर्षभर बाजरीनें आणि तेहि किडलेल्या व कडवट—जे ठाण मांडले, त्याचा उपद्रव त्यास किती होत आहे, याचें वर्णन का करावयास पाहिजे ?

७. धान्योत्पादनास खरेखुरे उत्तेजन मिळणें वाजवी आहे. केवळ जाहिरातबाजीनें कार्यभाग साधणार नाहीं. या दृष्टीनें देशांतील पडीक जमीन लागवडींत आणली जाणें जरूर आहे. उदाहरणार्थ रेल्वेच्या दोन्हीहि बाजूस हजारों एकर चांगली जमीन निष्कारण पडीक आहे, ती लागवडींत का आणली जाऊं नये ? तसेंच शेतकीच्या धंद्याला सरकारनें संरक्षण व उत्तेजन देणें वाजवी होणार आहे. शेतकऱ्यांना तगाई देण्यापासून ते तहत् कृषिप्रधान मालाच्या किंमती स्थिर राखणें व ठराविक पातळीच्या खालीं उतरल्यास, सरकारनें तो सारा माल योग्य किंमतीस खरेदी करणें, इतक्यापर्यंत संरक्षण मिळणें जरूर आहे.

८. हिंदुस्थान हा अखंड देश एक घटक आहे असें मानून, त्यांतील प्रांताप्रांतामध्यें अन्नपुरवठ्याची समान वांटणी होणें जरूर आहे. केवळ इथें आबादिआबाद आहे असें वरचेवर बोलून आणि हिंदी सैन्याची शूरत्वाचीं स्तुतिस्तोत्रें पार्लमेंटमध्यें गाऊन, हे प्रश्न सुटणार नाहींत.

९. प्रांत, संस्थानें व मध्यवर्ति सरकार यांच्यामध्यें एकोपा व सहकार्य निर्माण होणें जरूरीचे आहे. आज हिंदुस्थानसरकारच्या नियमांचा पत्ता प्रांतिक सरकारना नसतो, प्रांतिक सरकारच्या हुकूमांची दाद हिंदु-

स्थान सरकारला नसते, संस्थानें तर मनास वाटेल तसा अलिजाही कारभार चालवितात, कीं त्याला कसलाच निर्बंध नाहीं. सरकारी धोरणांत राष्ट्रीय दृष्टि पाहिजे व सुसूत्रता हवी. गेल्या वर्षांतील सरकारी लहरी, बहुरूपी व अनिश्चित धोरणामुळेंच आजची विचित्र परिस्थिति निर्माण झाली आहे. बाजारभाव नियंत्रण करावयाचे तर शास्त्रशुद्ध सारासार विचारानें सरकारनें करावयास हवें. नाहींपेक्षां कंट्रोलचे उपद्रवी अवडंबर बंद करून, खुली चढाओढीची देवघेव निष्प्रतिबंध देशांत चालू दिली, तर जनतेची निष्कारण होणारी पुष्कळ कुचंबणा कमी होईल.

राष्ट्रीय सरकारची प्राणप्रतिष्ठा

१० हिंदुस्थान देशासारखा अफाट देशांत भरपूर अन्नपुरवठ्याचा प्रश्न अगोदर सोडविल्याविना; शिधापद्धत अमलांत आणणें शक्य नाहीं आणि लोकांच्या हार्दिक सहकार्याशिवाय शिधापद्धत यशस्वी होणार नाहीं, असें स्पष्ट मत विलायतेहून अन्न पुरवठ्याचा प्रश्न सोडविण्यासाठीं नुकतेच आणलेल्या मि. कीर्बी यांनीं व्यक्त केले आहे. × इंग्लंडमधील शिधापद्धतीची योजना फार पूर्वी अत्यंत काळजीपूर्वक आंखण्यांत आली होती, म्हणून ती १९४०च्या भयंकर वैमानिक हल्ल्यामध्येंसुद्धां तग धरूं शकली. त्या कालांत लोकांनीं अतुल स्वार्थत्यागहि केला आहे.

× Until the supply position was more assured, the difficulties of a comprehensive rationing scheme were all the more complicated .... To be thoroughly effective and successful, any coordinated system of food-control and rationing required whole-hearted and generous public co-operation.

— Mr. Kirby.

"शिधापद्धतीच्या काढलेल्या कार्डास प्रत्येकजण मान देतो, तेथील चोरबाजारांचें उच्चाटण करण्यासाठीं दहा हजार पौंडापर्यंतच्या शिक्षा कठोरपणें व्यापाऱ्यांना ठोठाव्या लागल्या, तसेंच २५० वर मजूर कामावर असलेल्या कारखान्यांत सामुदायिक स्वयंपाकगृहें सक्तीनें उघडावयास लावून मजुरांच्या आहारांचा प्रश्न सरकारनें सोडविला, युद्धकालांत अशा प्रकारें नवीन तीन हजार सामुदायिक स्वयंपाकगृहें उघडलीं गेलीं व तीं लोकप्रिय बनली आणि स्त्रियांच्या होमबजेटास सरकारच्या बजेटाप्रमाणें मान दिला जातो" इ. इ. नवलपूर्ण कथा मि. कीर्नी यांनीं हिंदी लोकांना ऐकविल्या आहेत.

या साऱ्या गोष्टींचा सारांश इतकाच, कीं इंग्रज मनुष्य इतकी सारी कुचंबणा, गैरसोई मोठ्या हौसेनें सहन करीत आहे, याचें कारण तो आपल्या व जगांतील सर्व मानवजातीच्या स्वातंत्र्याकरितां स्वयंस्फूर्तीनें लढत आहे, ही पवित्र प्रेरणा होय. हिंदुस्थानसुद्धां याच पवित्र प्रेरणेनें प्रेरित होऊन, दोस्तांच्या खांद्यास खांदा लावून लढूं इच्छितो. पण तत्पूर्वी आपले शृंखलांनी जखडलेले हातपाय सोडविले जावे, अशी त्याची अत्यंतिक मनीषा आहे. आणि हें चालू लोकयुद्ध रणांगणावर व घरच्या आघाडीवर लोकांच्या हार्दिक सहकार्यावरच सरकारला लढविणें भाग आहे. या दृष्टीनें ही सहकार्याची जाणीव व आंच निर्माण होण्यास, राष्ट्रीय सरकारच्या प्राणप्रतिष्ठेशिवाय अन्य तोडगा नाहीं. आणि हिंदी लोकांच्या हृदयांत वास करीत असलेली राष्ट्रीय सरकारची मनीषा पुरी झाल्यास, चालू लोकयुद्धाकरितां पडणारा कसलाहि जांच, त्रास, कुचंबणा गैरसोई इ. तो हौसेनें सहन करण्यास तयार होऊन, स्वार्थत्यागपूर्वक कंबर बांधून लढण्यास प्रवृत्त होईल. म्हणूनच मी म्हणतो कीं चालू लोकयुद्धावर हमखास रामबाण उपाय म्हणजे, राष्ट्रीय सरकारच्या प्रतिष्ठापनेची मुहूर्तमेढ रोंवणे हा होय.

राष्ट्रधर्म पुस्तक-माला

१ राष्ट्रधर्म

—साने गुरूजी.

२ संसारांत पडण्यापूर्वी

—ना. ह. आपटे.

३ आव्हान

—जवाहरलाल नेहरू.

४ विद्यार्थ्यांशीं हितगूज

—ले. महात्मा गांधी.

५ समाज धर्म

—साने गुरूजी.

—: प्रकाशक :—

::: महाराष्ट्र ग्रंथ-भांडार, कोल्हापूर. :::